| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १०१ वा | गुरूवार, दिनांक २५ जून २०२६ | पृष्ठ ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुभद्रा अशोक रा. आलेश्वर ता. परंडा जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप सुमन रा. आलेश्वर ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१५.०६.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ३०,००० असा एकुण १,९१,२५०किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सुभद्रा अशोक कदम, वय ४४ वर्षे, रा. आलेश्वर ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२३.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(३), ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### वाळू चोरताना पकडला

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस श्रीकृष्णा दत्तात्रय नवले, यांनी दि.१७.०६.२०२६ रोजी शेत गअ नं ४२ चे शेतात शिराळा शिवारातुन सिना नदी पात्रातील अर्धा ब्रास वाळु (गौन खनिज) एकुण ३,५०० किंमतीचा माल चोरुन घेवुन जाताना मिळुन आला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- तुकाराम सर्जेराव वाळके, वय ४४ वर्षे, व्यावसाय ग्राममहसुल अधिकारी तहसिल कार्यालय परंडा सज्जा शिराळा ता. परंडा रा. दारफळ ता.माढा जि.सोलापुर यांनी दि.१९.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) सह २१(१), २१(२) गौन खनिज अधिनियम सह कलम ४७(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल सहिंता १९६६ सह कलम ३, ७ सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम १९४८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कॉपर वायरची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१२.०६.२०२६ रोजी इंन्टीग्राम इनर्जि लिमीटेड प्लांट साबळेवाडी येथील कॉपर केबल २,५०० मिटर एकुण २५,००० किंमतीचा माल रोहीत रा. आलमप्रभु रोड भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रोहीत प्रमोद गवळी, वय २४ वर्षे, रा. आलमप्रभु रोड भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.२३.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### दोन लाख साठ हजारच्या किंमतीच्या वायरची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयुर रा. घाटनांदुर ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि २२.०६.२०२६ रोजी २ घाटनांदुर शिवार रिन्यु पॉवर कंपनीच्या गट नं ६८० मधील ३३ केव्ही लाईनचे स्कोडा केबल वायर ४०० मिटर तोडून अंदाजे २,६०,००० किंमतीचे नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अमोल आश्रुबा मोटे, वय ४० वर्षेद्व रा. गिरवली ता. भुम जि. धाराशिव यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे वाशी येथे गुन्हा नोंदवला आहे.

## आषाढी वारीत भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी** :आषाढी वारी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्वपूर्ण सोहळा आहे. यंदाच्या वारीत लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होणारं नाही यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्यात यावे. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहोचणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पालखी सोहळा प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील वर्षी निर्मलवारी उपक्रम प्रभावीपणे राबविला असून यंदाचीही वारी सर्वांच्या सहकार्याने आणि पांडुरंगाच्या आशिर्वादाने यशस्वीपणे पार पडेल असे नियोजन करावे. यंदाच्या वारीसाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि मजबुतीकरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे पालखी मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी मोठ्या प्रमाणावर जर्मन हँगर उभारण्यात आले असून संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच इतर पालख्यांच्या मुक्कामस्थळी जर्मन हँगरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यांचे पालकमंत्री यांची नोडल पालकमंत्री व पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. डीजे मुक्त वारी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्वांशी चर्चा करून प्रयत्न करावेत. वारी सोहळा हा पारंपरिक पद्धतीनेच साजरा करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्याचा सकारात्मक विचार केला जाईल असे ही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले. आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा द्याव्यात. यंदाची वारी अधिक सुरक्षित, सुकर आणि संस्मरणीय करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, पालखी सोहळा प्रमुखांनी ज्या ज्या मागण्या केल्या होत्या त्याप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व कामे पूर्ण केली आहेत. महिलांसाठी रात्रीच्या मुक्कामाची विशेष सुरक्षितता घेतली आहे. वारकरी आणि भक्तांची काळजी घेत हा सोहळा चांगल्या प्रकारे साजरा करण्याचे आवाहनही यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केले.

ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पालखी मार्गावर वारकरी आणि भक्तांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.पालखी सोहळ्यात वारक-यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली आहे.पंढरपूर शहरात वारी सोहळ्यात आणि सोहळ्यानंतर स्वच्छतेचे सर्व नियोजन केले असल्याचे ही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले.

पुणे विभागीय आयुक्त शितल तेली - उगले यांनी सादरीकरणाद्वारे प्रशासनाने केलेल्या तयारीची माहिती दिली. बैठकीस संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, पोलीस आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

## सामाजिक न्याय दिनानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**धाराशिव/प्रतिनिधी:** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २६ जून हा दिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो.त्यानिमित्त जिल्ह्यात जिल्ह-ास्तर, तालुकास्तर तसेच गावपातळीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे .२५ जून २०२५ रोजी सामाजिक न्याय दिन उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरावरील कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता समता दिंडीने होणार आहे.मल्टीपर्पज हायस्कूल येथून प्रारंभ होणाऱ्या या दिंडीचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर व पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.दिंडीत महाविद्यालये, माध्यमिक शाळांतील विद्यार्थी तसेच एनसीसी, एनएसएस आणि स्काऊट-गाईडचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

समता दिंडी जिल्हा परिषद परिसरातून मार्गक्रमण करत डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना अभिवादन करत यशवंतराव चव्हाण सभागृह,जिल्हा परिषद येथे तिचा समारोप होईल.यानंतर सामाजिक न्याय दिनाचा मुख्य कार्यक्रम दुपारी १२ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार राहणार असून समाज कल्याण विभागामार्फत पुरस्कार प्राप्त पुरस्कर्ते,विद्यार्थी व नागरिकांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.कार्यक्रमात राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.तसेच जिल्ह्यातील सर्वसाधारण गुणवत्ता यादीत प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यास राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यात येईल. इयत्ता दहावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून अकरावीत प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती,तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात येणार आहे.

याशिवाय निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तालुकास्तरावरही सामाजिक न्याय दिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.सर्व गटविकास अधिकाऱ्यांनी तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली आणि गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या सहकार्याने समता दिंडी व मुख्य कार्यक्रमांचे आयोजन करावयाचे आहे.तालुकास्तरावर राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार असून दहावीमध्ये विशेष प्राविण्य मिळवून अकरावीत प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन प्रदान करण्यात येणार आहे.

## ३१ पैकी १० तलावांत २० टक्क्यांच्या खाली पाणीसाठा उपलब्ध

**उमरगा/प्रतिनिधी:** उमरगा तालुक्यात जून महिन्यात पाऊस झाला नसल्याने तलावातील पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झाली नाही. गेल्या महिन्यात धाराशिव, कळंब, भूम, परंडा तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली. उमरगा तालुक्यात ३४ सिंचन प्रकल्पांपैकी केवळ १३ प्रकल्पात २५ टक्क्यांखाली उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. बेनीतुरा मध्यम प्रकल्पात २४.३० टक्के, जकापूर प्रकल्पात १७.८३ टक्के, तुरोरी प्रकल्प १४.११ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. दहा तलावांत २० टक्क्यांपेक्षा कमी आणि २१ तलावांमध्ये शून्य पाणीसाठा उपलब्ध आहे.

उमरगा उस्मानाबाद पाटबंधारे विभाग क्रमांक दोन अंतर्गत उमरगा तालुक्यात तीन मध्यम प्रकल्पासह एकूण ३४ लपा व साठवण तलाव आहेत. तालुक्यात अवकाळी व २२ जूनपर्यंत फक्त ६४ मिलिमीटर इतका पाऊस झाला आहे. मागील वर्षात अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने पाणीपातळीत काही तलावात वाढ झालेली असली तरी अनेक तलावांत पाणी साठा वाढला नाही. पावसाने जून महिन्यात पाठ फिरवली असल्याने तीन मध्यम प्रकल्पासह ३१ साठवण तलाव पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. तालुक्यात तीन मध्यम प्रकल्पांपैकी बेनीतुरा प्रकल्पात २४.३० टक्के, तुरोरी मध्यम प्रकल्प १४.११ टक्के तर जकापूर प्रकल्पात १७.८३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. उन्हाळ्यात ग्रामस्थांची तहान भागवण्यासाठी जोरदार पावसाची आवश्यकता आहे.

तालुक्यात ३१ लपा व साठवण तलावांपैकी कोळसुर १८.०५ टक्के, कोरेगाव ०७.८२ टक्के, कसमलवाडी ३.९२ टक्के,कुन्हाळी ०.५९ टक्के,तलमोडवाडी १८.११ टक्के, दाळिंब १९.९२, सरोडी १६.०७, कसगी १०.७६, एकुरगा ०५.३५ टक्के, दगड धानोरा ०१.४१ टक्के या दहा तलावात उपयुक्त साठा उपलब्ध असून पावसाने अशीच दडी मारली तर उर्वरित २१ तलावासह ३४ तलाव कोरडे पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. येणाऱ्या काळात तालुक्यात भीषण पाणीटंचाई आणि दुष्काळाचे संकट ओढावण्याची शक्यता नागरिकांतून वर्तवण्यात येत आहे.

२१ तलावांमध्ये शून्य टक्के पाणीसाठा शिल्लक आहे तालुक्यात ३४ तलावांपैकी २१ तलावात शून्य टक्के पाणीसाठा आहे. यामध्ये भिकार सांगवी, गुंजोटीवाडी, केसरजवळगा, भुसणी, डिग्गी, बलसूर, मुरळी, कदेर, केसरजवळगा क्र दोन, गुंजोटी, आलूर, नारंगवाडी, वागदरी, बलसूर क्र दोन, सुपतगाव, रामनगर, कोराळ, पेठसांगवी काळ निंबाळा, कोरेगाववाडी आलूर लपा असे २१ तलावामध्ये उपयुक्त पाणीसाठा शून्य टक्के आहे.लोहारा तालुक्यात सिंचनासाठी ११ साठवण तलाव लोहारा तालुक्यात चार लघु व सात साठवण तलावात गेल्या वर्षात चार तलावात शंभर टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. त्यात अचलेर, लोहारा लपा, जेवळी आणि माळेगाव साठवण तलावात १०० टक्के पाणीसाठा होता. अचलेर तलावात ८३.४५ टक्के, बेलवाडी तलाव ६०.२२ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता. यंदा अचलेर लपा प्रकल्पात १३.८६ टक्के, अचलेर साठवण तलावात ३२.४९ टक्के, बेलवाडी १०.८२ टक्के पाणी-साठा उपलब्ध आहे. तर लोहारा, धानोरी, हिप्परगा, जेवळी क्रमांक एक व दोन, माळेगाव, हिप्परगा रवा व भोसगा साठवण तलावात उपयुक्त पाणीसाठा नाही.

## धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने निवेदन

**धाराशिव/प्रतिनिधी:**

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार खते व बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांना सूचना देणे बाबत जिल्हाधिकारी धाराशिव यांना निवेदन देण्यात आले.

कृषी सेवा केंद्रांवर दर्जाहीन, निकृष्ट दर्जाचे बियाणे व खते विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत आपण तुळजापूर तालुक्यात केलेल्या कार्यवाहीचे आम्ही अभिनंदन करतो.परंतु केवळ शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर धाड टाकण्यापेक्षा, सरसकट सर्व तालुक्यांमध्ये नियमित व अनियमित तपासण्या करण्यासाठी आपण सर्व तालुका कृषी अधिकारी यांना स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी विनंती आहे.

यासोबतच खालील उपाययोजना करण्याची विनंती केली. या उपाय योजनेमध्ये.

१) शेतकऱ्याच्या मागणीनुसारच खते बियाणे देऊन त्याचा दर हा एमआरपी नुसार आकारण्यात यावा. एम आर पी पेक्षा चढ्या भावाने विक्री करणारावर व विनाकारण दुसरी वस्तू घेण्यास भाग पडणारावर कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्या.

२) प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र ऑनलाइन व ऑफलाइन तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करणे.या सुविधेची माहिती आपल्या सहाय्यकांमार्फत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध करणे.

३) काही कृषी सेवा केंद्रांवर बियाणे खरेदी करताना दुकानदार त्यांना जे खत किंवा औषध विकायचे आहे तेच घेण्यासाठी बंधन करतात त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. यावरही कारवाई करावी. वरील उपाययोजनांमुळे शेतकरी अधिक जागरूक राहतील आणि अडचण उद्भवल्यास तात्काळ तक्रार करतील. त्यामुळे फसवणूक रोखण्यास मदत होईल व शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येईल.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भाजपा आपली ताकद वाढवित आहे

भारतीय जनता पार्टी आपल्या मित्र पक्षाच्या मदतीने संख्यात्मक वाढ करून आपली ताकद वाढवित आहे. २०२४ ला मोठा फटका बसला होता. निसटते यश मिळविता आले. थोडा तरी फरक पडला असता तर हातून सत्ता गेली असती. काँग्रेस पक्षाने थोडाजोर मारला असता तर भाजपा व मित्र पक्षाला सत्तेपासून दूर राहावे लागले असते. इंडिया आघाडीत बिघाडी झाली. ममता बॅनर्जी त्यावेळी आलिप्त होत्या. त्यांचा प.बंगालमध्ये मोठा पराभव झाल्याने त्या परत संपुआच्या इंडिया आघाडीकडे वळल्या. २०२४ ची परिस्थितीची आठवण ठेवुन भाजपा मोठा सावध झाला. त्यानंतर दोन वर्षाच्या आता चारशेच्याजवळ जाण्याचा मनसुबा यशस्वी करताना दिसून येत आहे. भाजपामध्ये येत नसेल तर मित्र पक्षात घेवून ताकद वाढविली जात आहे. मुळात भाजपा हा अधिक संख्याबळ मिळविण्याचा जो प्रयत्न आहे तो यशस्वी होताना दिसून येत आहे. राज्यात एका शिवसेनेची दोन झाल्या. मुळात उद्धव ठाकरे यांना वाटत होते की, शिवसैनिक सोडून जाणार नाहीत. ते झोपीत होते. परिस्थितीची बदलाची चाहुल त्यांना लागली नाही. वरचेवर परिस्थिती बदलत गेली. भाजपा जी खेळी खेळत आहे ती जवळपास विरोधक संपविण्याची दिसून येत आहे. एकनाथ शिंदे यांना मोठे पाठबळ भाजपाचे आहे. त्याशिवाय एकनाथ शिंदे हे धाडसी पावुल टाकणार नाहीत. अमित शहा यांच्यासल्ल्याने ऑपरेशन टायगर यशस्वी झाले हे मान्यच केले पाहिजे. ऑपरेशन टायगर मोठे कठिण होते. एका शिवसेनेतून दुसऱ्या शिवसेत लोकप्रतिनिधी आणणे कठिण होते. नवु पैकी सहा खासदार फोडणे अग्निदिव्य होते. सहामध्ये सर्वात ओमराजे निंबाळकर यांचा प्रवेश कठिण होता. त्यांच्या पाठीशी मोठा मतदार संघ आहे. ते सर्वांचे फोन उचलतात. त्यांचे जनतेशी असलेले नेटवर्क मोठे आहे. कोणीही व कधीही फोन केल्यास हजर असतात, बोलतात. धारशिव जिल्ह्यात जीव धोक्यात घालुन वाहणाऱ्या पाण्यातून नागरिकांना वाचविले. त्या बाबीचा व्हीडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. परिस्थिती आवघड असताना ते निवडूण येतात. त्यांना फोडणे आवघड होते. तरी एकनाथ शिंदे यांनी केलेली कमाल व खा. ओमराजे निंबाळकर यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे. तसा व्यवहार्य विचार केला तर आता बुडत्या जहाजात कोणी बसत नाही. जनतेची कामे होत नसतील तर त्यांनी निवडलेला मार्ग योग्य आहे. पक्षा पेक्षा जनतेची कामे होणे अपेक्षित असतात. त्यांची यशाची पावती ही जनतेची कामे हीच आहे. जनतेची कामे होत नसतील तर जनता नाराज होणे हे अपेक्षित आहे. जनतेला कामे होणे अपेक्षित असतात. निक्रियता काही कामाची नाही. खासदार ओमराजे सारखा तरूण उमदा नेत्यांला केंद्रात राज्यमंत्रीपद दिल्यास रालोआची ताकद वाढणार आहे. जिल्ह्यात जो संघर्ष नात्यातील होणारा त्याला विराम मिळेल. धाराशिव जिल्ह्यात काँग्रेसपेक्षा भाजपा-त्यांच्या समविचारी शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या विचाराची मंडळी आहे. आ. तानाजी सावंत, आता मुरूमचे विधानपरिषदेवर निवडूण आलेले बसवराज पाटील यांचे राजकिय कार्यक्षेत्र धाराशिव जिल्हा आहे. खा. ओमराजे निंबाळकर यांच्या सहकार्याने धाराशिव विधानसभेची जागा कैलास पाटील यांच्या रुपात मिळावी आहे. उमरगा येथील आमदार स्वामी हे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आहेत. तरी खा. ओमराजे यांच्या जवळचे समजले जातात. एकंदरीत विचार केला तर केंद्रातील भाजपा-मित्रपक्षाची ताकद वाढविली जात आहे. तसे राज्यात विरोधकांची स्थिती समाधानाची नाही. उद्धव ठाकरे गटाकडे तीन खासदार उरले आहेत. राष्ट्रवादी शरद पवार व काँग्रेसकडे तशीच बिकट स्थिती आहे. गोळाबेरीज केली तर हसू होते. नुकतेच भाजपाने प. बंगाल राज्य जिंकले व चार राज्यात सहज सत्ता आल्यामुळे मोठी ताकद प्राप्त झाली आहे. भाजपा पक्षश्रेष्ट एकनाथ शिंदे गटाचे खासदार आहेत त्यांना लवकरच मंत्री पद देवून विश्वास मजबुत करतील. इतरही पक्षातील मोठे गट आपल्याकडे येतील हा विश्वास निर्माण करण्याचा डाव आहे. त्यामुळे आगामी काळात एका वर्षात चारशेपारचा नारा प्रत्यक्षात उतरणार आहे. रालोआची ताकद वाढत आहे तर विरोधीपक्षाची कमकुवत होत आहे. अशा स्थितीत लोकशाहीला धोका होवू शकतो की काय असे वाटत आहे. लोकशाहीत सत्ताधाऱ्यापेक्षा विरोध हे मजबुत असले पाहिजे. तेच कमकुवत होताना दिसून येत आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या धाडसामुळे राज्यात भाजपाला सत्ता हस्तगत करण्यात आली होती. पन्नास आमदार वेगळे करून पाठींबा मिळविता आला. ऑपरेशन टायगर यशस्वी केले. वास्तविक ऑपरेशन टायगर हे सहज यशस्वी होणे आवघड होते तरी ते उपमुख्यमंत्री यांनी करून दाखविले. सर्वात मोठा धक्का हा उद्धव ठाकरे यांना दिला गेला. ठाकरे यांच्याकडून नको ते आरोप करण्यात येत आहेत. मिंदे, रेडे, खोके असे आरोप आजही उद्धव ठाकरे यांच्या चिरंजीवाकडून होतात, हे कोठे तरी उद्धव ठाकरे गटातून थांबविले पाहिजे. तीन वर्षानंतर विधान सभा व लोकसभेच्या निवडणुकीला समोरे जावे लागणार आहे. याची तयारी भाजपा व मित्रपक्षाकडून होताना दिसून येत आहे. विरोधकाकडून काहीच हालचाली नाहीत. यावरून २०२९ मध्ये पुन्हा रालोआला मोठे यश मिळेल अशीच तयारी आहे. राज्यात यावर्षातील मोठा धक्का सहा खासदार तेही उद्धव ठाकरे गटाचे शिंदे गटात आहे, त्याच प्रमाणे विधानपरिषदेत सतरा आमदार महायुतीचे निवडूण आले. सर्व घडामोडी ह्या महत्वाच्या भाजपासाठी ताकद वाढविणाऱ्या आहेत. राज्यात आणखीन एक गट वेगळा होण्याच्या तयारीत आहे असे दिसून येते. त्याच प्रमाणे काही पक्ष विलीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जागजिक युद्ध म्हणजे अमेरिका व इराण दरम्यान युद्ध झाले नसते तर भाजपा मोठमोठी योजना जाहिर करण्याच्या तयारीत होता असेही वृत्त होते. युद्धामुळे ब्रेक लागले आहे. आगामी काळात विरोधकांच्या हाती काही लागेल असे सत्ताधारी ठेवणार नाहीत. महाराष्ट्रात दैयनिय आवस्था विरोधकांची दिसून येणार आहे असे दिसत आहे. त्यामुळे आडीच वर्षात कोणते निर्णय घेता येतील. जनतेसोबत कसे राहाता येईल. जनतेला आकर्षित कसे केले जाईल याचा विचार विरोधकांना करावा लागेल. शरद पवार, काँग्रेस व उद्धव ठाकरे यांच्या पक्षासाठी आगामी काळ कठिण आहे. सत्ताधाऱ्यात एकनाथ शिंदे पक्षाची ताकद आगामी काळात वाढणार आहे. भाजपासोबत राहून एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची लोकप्रियतेत वाढ होणार आहे.

# विश्वासाच्या दरीत कोसळलेले स्वप्न

लोहगडाची ती धुक्याने वेढलेली सकाळ. निसर्गाच्या कुशीत विसावलेला तो अभेद्य किल्ला, जो शतकानुशतके अनेक युद्धांचा आणि पराक्रमांचा साक्षीदार राहिला आहे.

त्याच्या दगडी तटबंदीने अनेक वादळे झेलली, पण त्या दिवशी या तटबंदीने जो विश्वासघात पाहिला, तो काळ्या दगडांनाही पाझर फोडणारा होता. ती खोल दरी, जिच्याकडे पाहताना डोळे फिरतात, ती दरी त्या दिवशी फक्त एका माणसाला गिळंकृत करत नव्हती, तर ती एका संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने, एक निष्पाप विश्वास आणि आपल्या समाजातील उरलीसुरली माणुसकीच स्वतःच्या अंधारात ओढत होती.



तरुण केतन अग्रवालने हातात फुलांचा हार आणि डोळ्यांत संसाराची सोनेरी स्वप्ने घेऊन आयुष्याच्या एका नव्या वाटेवर पाऊल टाकले होते. लग्नाची स्वप्ने ही माणसाच्या आयुष्यातील सर्वात तरल आणि नाजूक वळणे असतात. या वळणावर माणूस आपला सारा भूतकाळ, आपले सारे अस्तित्व एका नव्या नात्यात, एका नव्या व्यक्तीवर विसंबून ठेवतो. केतननेही तोच विश्वास सियावर ठेवला होता. पण ज्या हातांनी आयुष्यभर सुख-दुःखात साथ देण्याची शपथ घ्यायची होती, ज्या हातांनी त्याच्या अस्तित्वाला आकार द्यायचा होता, त्याच हातांनी त्याला मृत्यूच्या त्या भयावह दरीत ढकलले. हा केवळ एका माणसाचा

मृत्यू नव्हता, तर हा एका विश्वासाच्या मंदिरातील दीप विझवणारा अघोरी क्षण होता. त्या गडावर एक प्रश्न सतत वाऱ्याच्या हुंदळणाऱ्या झुळुकीसोबत घुमत राहतो- नाते नको असेल तर नकार देता आला असता, मग मृत्यूच का निवडला?; प्रेमाच्या किंवा स्वातंत्र्याच्या नावाखाली आपण आज इतके क्रूर होत चाललो आहोत का, की आपल्याला नको असलेल्या गोष्टीला नकार देण्यापेक्षा, त्या व्यक्तीचे अस्तित्वच संपवून टाकणे अधिक सोपे वाटू लागले आहे. तुटलेला पूल पुन्हा बांधता येतो, पण एकदा दरीत कोसळलेला जीव आणि चिरडलेला विश्वास पुन्हा कसा उभा राहणार? सिया गोयल आणि केतन अग्रवाल यांच्यात जे काही घडले, ते केवळ एका गुन्ह्याचा वृत्तांत नाही. ती एक भयावह सामाजिक प्रवृत्ती आहे जी मुखवटे घालून आपल्या आजूबाजूला वावरत आहे.

आजकाल आपण पाहतो की नाती तुटण्यापेक्षा माणसेच संपवली जातात. स्वातंत्र्य आणि निवडीचा अधिकार म्हणजे दुसऱ्याचे आयुष्य हिरावून घेणे नव्हे. प्रेम म्हणजे मुक्ती असते, मालकी नव्हे. न पटणाऱ्या गोष्टीला नकार देणे हा मानवी अधिकार आहे, पण दुसऱ्याचे अस्तित्व नाकारणे हा माणुसकीविरुद्धचा अक्षम्य अपराध आहे. जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्याचा जीव इतक्या थंड डोक्याने घेते, तेव्हा ती केवळ एक नावडते नाते संपवत नसते, तर ती मानवी जीवनाच्या मूलभूत मूल्यांनाच पायदळी तुडवत असते.

या घटनेने अनेक घरे उद्ध्वस्त केली आहेत. केतनच्या आईच्या अंगणातील तो आशेचा दिवा आता कायमचा विझला आहे. वडिलांच्या डोळ्यांत भविष्यासाठी पाहिलेले स्वप्न एका क्षणात अंधारात बुडून गेले आहे. बहिणीच्या मनात उरला आहे तो फक्त संशय आणि एक अस्वस्थ करणारी जाणीव, की ज्या जगावर आपण विश्वास ठेवतो, ते खरोखरच इतके बेगडी आहे का? समाजाच्या मनात निर्माण झालेली असुरक्षितता ही या घटनेची सर्वात मोठी शोकांतिका आहे. जेव्हा असे काही घडते, तेव्हा फक्त एका घराचीच नाही, तर संपूर्ण समाजाचीच तटबंदी ढासळते. आपण आपल्याच लोकांवर संशय घेऊ लागतो, प्रेमाच्या आणि विश्वासाच्या नात्यांवर प्रश्नचिन्ह उभे राहते.

धुक्यात हरवलेली ती पाऊलवाट आता पुन्हा कधीही त्याच विश्वासाने चालली जाणार नाही. गडावरील शांतता आता भकास वाटते. केतन गेला, पण जाताना तो आपल्या सर्वांसाठी एक वेदनादायी आणि अंतर्मुख करणारा प्रश्न सोडून गेला आहे. लोहगडाच्या त्या खोल दरीकडे पाहताना आज मन सुन्न होते. तेथे कोसळलेला केतन हा केवळ एक तरुण नव्हता, त्याच्यासोबत विश्वास, निष्पापपणा आणि माणुसकी त्या दरीत कायमची गडप झाली आहे. विवाह करु इच्छिणाऱ्या दोघांनी विश्वासाने संवाद साधावा, आपल आरोग्य, आवडीनिवडी पुर्वइतिहास यावर चर्चा करावी, आपले स्वभाव जुळत असतील आणि संसार सुखाचा होत असेल तर एकत्र याव. विशेषतः पालकांनी दोघानाही कोणातेही बंधन घालू नयेत नाही तर असा अनर्थ होवू शकतो. तुर्तास मात्र वाऱ्याच्या प्रत्येक झुळुकीसोबत आज एकच अस्वस्थ करणारा प्रश्न तरळत राहतो- आज दरीत कोसळला तो फक्त एक जीव होता, की आपल्या समाजातील उरलेली संवेदनशीलताच?

विश्वासाच्या दरीत...

हाती होता फुलांचा हार,
डोळ्यांत स्वप्नांचे आकाश,
विश्वासाच्या नवीन वाटेवर, उमटला
होता भास! चेहऱ्यावरती हसरे
चांदणे, शब्दांत गोडवा होता, पण
पाकळ्यांच्या त्या गर्भात, काट्यांचा
खेळ लपला होता.

दगडांच्या त्या किल्ल्यावरती,
मनांचे गड ढासळले, सांधणारा
तो पूल प्रेमाचा, विश्वासघातानी
विरघळले! हात धरायला पुढे
आलेले, तेच हात हे क्रूर निघाले,
मुखवट्यांच्या त्या सावलीत,
माणुसकीचे लचके तोडले.

मार्ग होते, शब्द होते, नकाराची
होती वाट, स्वैर मुक्त आकाश
असताना, का रचला खुनाचा घाट?
स्वतःच्या हव्यास-वेदीवर, दुसऱ्याचा
जीव का जाळला?

इच्छेच्या त्या आंधळ्या सुरात,
माणूसपण का गाडला? आईच्या
अंगणी विझला दिवा, बापाचा तारा
हरवला, एका देहाच्या पतनासोबत,
अख्खा संसारच ओसरला! भिंती
विचारती प्रश्न आज, हुंदके दाटून
कंठी,

गुन्हा कोणता केला लेकरा?;
विचारते ही माती. ही जखम नाही
एका जीवाची, ही समाजाची
मोठी भेग आहे, नात्यांच्या पवित्र
मातीमध्ये, स्वार्थाचा वाढता वेग
आहे!

प्रेम म्हणजे कैद नसून, ते एक
मुक्त गाणे असते, पण क्रौर्याच्या त्या
छायेत, माणुसकीच का हरवते? आज
दरीत कोसळला एक जीव, उद्या
कोणाची पाळी?

मुखवट्यांच्या या गर्दीमध्ये,
सत्याची कोण देईल टाळी?
जपा रे विश्वास-नाती, जपून ठेवा
माणुसकी,एका मृत्यूच्या साक्षीने, मरते



संवेदनशील देवकी.

**-लेखक**
**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मो. ९८९०५७७१२८**

# पालखी सोहळा अथ- ते इथपर्यंतचा प्रवास



संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचा इतिहास हा केवळ धार्मिक परंपरेचा इतिहास नाही, तर तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि लोकजीवनाचा चालता-बोलता दस्तऐवज आहे. आज लाखो वारकरी, शेकडो दिंड्या, डिजिटल नियंत्रण व्यवस्था, ड्रोन निरीक्षण, प्रशस्त चौपदरी रस्ते आणि अत्याधुनिक सुविधा यांसह दिसणारा पालखी सोहळा एकेकाळी अत्यंत साध्या, कष्टमय आणि खडतर पायी यात्रेच्या स्वरूपात अस्तित्वात होता. चिखलातून, नदी-नाल्यांतून, डोंगर-दऱ्यांतून आणि काटेरी पायवाटांवरून विठ्ठलाच्या भेटीस निघालेल्या या यात्रेने काळानुसार आधुनिकतेचा स्वीकार केला; पण तिच्या भक्तीचा आत्मा मात्र आजही तितकाच जिवंत आहे.

**संतकालीन वारी : भक्ती, साधेपणा आणि सामूहिकता**

संतांच्या काळात आजच्या अर्थाने पालखी सोहळा अशी औपचारिक संकल्पना अस्तित्वात नव्हती. वारकरी टाळ-मृदंग, वीणा, भगवी पताका आणि संतांच्या पादुका किंवा स्मृतीचिन्हांसह पायी पंढरपूरकडे प्रस्थान करत असत. गावोगावी मुक्काम, रात्री भजन-कीर्तन, पहाटे हरिनामाचा गजर आणि पुन्हा प्रवास एवढ्याच साधेपणात वारी वाहत होती. ना रथ, ना चोपदार, ना नियोजित मुक्काम, ना प्रशासकीय व्यवस्था. विठ्ठलनाम हाच आधार आणि सामूहिक भक्ती हीच ताकद होती.

संत तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमनानंतर त्यांचे धाकटे चिरंजीव नारायण महाराज यांनी वारीची सूत्रे हाती घेतली. त्यांनी वारकऱ्यांचे संघटन करून वारीला अधिक नियमित आणि शिस्तबद्ध स्वरूप दिले. वारकरी परंपरेतील काही उल्लेखांनुसार, प्रारंभी काही काळ दोन्ही संतपरंपरांमध्ये एकात्म भावाने वारी केली जात असे. त्यामुळे ज्ञानोबा-तुकोबा हा संयुक्त गजर वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक एकात्मतेचे प्रतीक बनला.

**खडतर मार्ग, पावसाळी वाटा आणि जीवघेणा प्रवास**

आज जसे चौपदरी महामार्ग आणि प्रशस्त रस्ते आहेत तसे त्या काळात नव्हते. पालखी मार्ग हा मुख्यतः मातीचे रस्ते, जंगलातील पायवाटा, नदीकाठचे मार्ग आणि व्यापारी घोडेमार्ग यांवर आधारित होता. पावसाळ्यात नद्या दुथडी भरून वाहत आणि अनेकदा वारकऱ्यांना पाण्यातूनच मार्ग काढावा लागत असे. काही ठिकाणी होड्यांचा आधार घ्यावा लागे. दिवे घाट, जेजुरी परिसर आणि माळशिरसकडील अनेक टप्पे अत्यंत खडतर मानले जात.

देहूहून निघणारी वारी साधारण देहू - पुणे - हडपसर - सासवड - जेजुरी - लोणंद - फलटण परिसर - माळशिरस - वाखरी - पंढरपूर या पट्ट्यातून जात असे आता ती

देहू, पिंपरी-चिंचवड, पुणे, हडपसर, लोणीकाळभोर, यवत, वरवंड, पाटस, उडंवडी गवळ्याची, बारामती, सणसर, निमगाव केतकी, इंदापूर, सराटी, आकलुज, बोरगाव, पिराची कुरोली, वाखरी-पंढरपूर अशी जाते ; तर आळंदीहून निघणारी माऊलींची वारी आळंदी - पुणे - दिवे घाट - सासवड - जेजुरी - लोणंद - तरडगाव - नातेपुते - माळशिरस - वाखरी - पंढरपूर या मार्गाने पुढे सरकत असे. मात्र हे मार्ग आजसारखे निश्चित नव्हते. पावसाचा जोर, नदीची स्थिती आणि सुरक्षितता लक्षात घेऊन मार्गात बदल होत असत.

**दोन परंपरा, एकच भक्तीभाव**

सुरुवातीच्या काळात वारी ही एकत्रित भक्ती परंपरा होती. मात्र पुढे देहूची संत तुकाराम महाराज पालखी आणि आळंदीची संत ज्ञानेश्वर महाराज पालखी अशा दोन स्वतंत्र परंपरा विकसित झाल्या. दोन्ही संतांचे धार्मिक केंद्र, अनुयायी, दिंड्या आणि मानकरी वेगळे होत गेले. त्यामुळे स्वतंत्र पालख्या, स्वतंत्र मुक्काम आणि स्वतंत्र शिस्त निर्माण झाली. तरीही ज्ञानोबा-तुकोबाचा गजर दोन्ही परंपरांच्या आध्यात्मिक ऐक्याचे प्रतीक म्हणून कायम राहिला.

**हैबतबाबा आरफाळकर आणि पालखी सोहळ्याचे संघटन**

पालखी सोहळ्याला संघटित, शिस्तबद्ध आणि सार्वजनिक स्वरूप देण्याचे मोठे श्रेय हैबतबाबा आरफाळकर यांना जाते. ग्वाल्हेरकर शिंद्यांच्या सैन्यात सरदार म्हणून काम केल्याने लष्करी शिस्त त्यांच्या अंगी भिनली होती. त्यांनी तीच शिस्त वारीत उतरवली.

पालखी सोहळ्याची रथ, दिंडी, चोपदार आणि मानव्यवस्थेसह अधिक संघटित पुनर्रचना करण्यात आली. दिंड्यांना क्रमांक देण्यात आले, मुक्काम आणि प्रस्थानाच्या वेळा निश्चित करण्यात आल्या. चोपदार, नगारखाना, अश्व, ध्वज आणि शामियाने यांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे वारी एका साध्या भक्ती यात्रेतून शिस्तबद्ध लोकसोहळ्यात रूपांतरित झाली.

विविध सरदार, संस्थानिक आणि जहागीरदारांनी धान्य, घोडे, तंबू आणि आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली. आजही पालखीतील अनेक मानपरंपरा त्या इतिहासाच्या जिवंत साक्षी मानल्या जातात.

**महाराष्ट्र शासनाचा वाढता सहभाग**

दीर्घकाळ वारीचे व्यवस्थापन हे स्थानिक गावकरी, मानकरी, दिंडीप्रमुख आणि वारकरी परंपरेच्या सामूहिक शिस्तीवर आधारित होते. पूर्वीपासून काही प्रमाणात प्रशासकीय मदत असली तरी १९९० च्या दशकानंतर शासनाचा सहभाग अधिक औपचारिक आणि व्यापक झाला. निर्मल वारीसारख्या स्वच्छता मोहिमा, आरोग्य सुविधा आणि वाहतूक नियंत्रण यांमधून शासनाची भूमिका अधिक स्पष्ट झाली. त्यानंतर पालखी मार्गांचा विकास, मूलभूत सुविधा, मुक्काम व्यवस्थापन आणि समन्वित नियोजन या कामांना अधिक गती मिळाली.

वारीच्या यशस्वी आयोजनासाठी शासनाकडून पालखी मार्गांची दुरुस्ती, तात्पुरते रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पालखी तळांवर निवाऱ्याची सोय केली जाऊ लागली. आरोग्य विभागामार्फत फिरते दवाखाने, रुग्णवाहिका, आरोग्यदूत आणि वैद्यकीय पथके तैनात करण्यात येऊ लागली. निर्मल वारी अभियानांतर्गत स्वच्छतेसाठी विशेष निधी आणि मनुष्यबळाची तरतूद करण्यात आली; तर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि वाहतूक नियंत्रणासाठी मोठा पोलीस बंदोबस्त उभा राहू लागला.

अलीकडील काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालखी नियोजनासंदर्भात विशेष बैठका घेऊन प्रशासनाला आवश्यक सुविधा आणि समन्वयाबाबत निर्देश दिले. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही पालखी व्यवस्थापनासंदर्भात संयुक्त बैठका घेऊन विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यावर भर दिला.

**प्रशासन, तंत्रज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापन**

आजचा पालखी सोहळा हा महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या प्रशासकीय व्यवस्थापनांपैकी एक मानला जातो. लाखो वारकरी सुमारे तीन आठवडे पायी चालत असताना संपूर्ण प्रशासन त्यांच्या सेवेसाठी कार्यरत असते. जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामपंचायती, महापालिका, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, वीज वितरण कंपन्या आणि स्वयंसेवी संस्था यांचा मोठा समन्वय या काळात पाहायला मिळतो.

वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मोबाइल शौचालये, आरोग्य तपासणी शिबिरे, रुग्णवाहिका, हरवलेल्यांसाठी नियंत्रण कक्ष, स्वच्छता मोहीम, वाहतूक नियंत्रण आणि मुक्काम व्यवस्था मोठ्या प्रमाणावर केली जाते. आता वारीत ड्रोन निरीक्षण, सीसीटीव्ही, डिजिटल कमांड सेंटर आणि जीपीएस आधारित नियंत्रण व्यवस्थेचाही वापर होतो. लाखो लोकांचा हा प्रवास कोणताही मोठा अनुशासनभंग न होता पूर्ण होतो, हे प्रशासन आणि वारकरी शिस्त यांच्या अद्वितीय समन्वयाचे उदाहरण मानले जाते.

**केंद्र सरकार आणि राज्य शासनच्या पुढाकारातून पालखी मार्गाचा कायापालट**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालखी मार्गाच्या विकासासाठी विशेष लक्ष दिल्यानंतर या ऐतिहासिक वारीला आधुनिक पायाभूत सुविधांची नवी जोड मिळाली. वाढती वाहतूक, वारकऱ्यांची वाढती संख्या आणि सुरक्षिततेच्या गरजा लक्षात घेऊन पालखी मार्ग अधिक सुरक्षित, रुंद आणि सुसज्ज करण्याची कामे वेगाने सुरू झाली.

पुणे ते पंढरपूर या मार्गावर रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, सेवा रस्ते, वाहतूक नियंत्रण व्यवस्था आणि काही ठिकाणी वारकऱ्यांसाठी संरक्षित पदयात्रा मार्ग उभारण्यावर भर देण्यात आला. पालखी मार्ग हा केवळ धार्मिक प्रवासाचा रस्ता नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनवाहिनीचा भाग आहे, या दृष्टीने केंद्र आणि राज्य शासनाने त्याच्या विकासाकडे पाहण्यास सुरुवात केली.

**नव्या पालखी मार्गावरील आधुनिक सुविधा**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या चौपदरीकरणामुळे वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुखकर झाला आहे. नव्याने विकसित करण्यात आलेल्या मार्गावर अनेक सुविधा उभारण्यात आल्या असून काही कामे अद्याप प्रगतिपथावर आहेत.

काही ठिकाणी वारकऱ्यांसाठी मुख्य महामार्गापासून स्वतंत्र अथवा संरक्षित पदयात्रा मार्ग विकसित करण्यात आला आहे. त्यामुळे वाहनांच्या वर्दळीपासून वारकऱ्यांचे संरक्षण होण्यास मदत होते. पालखी तळांवर संरक्षक भिंती, पालखी कट्टे, कायमस्वरूपी स्वच्छतागृहे, हँगर व्यवस्था आणि हायमास्ट प्रकाशयोजना उभारण्यात आली आहे.

मार्गाच्या दुतर्फा वड, पिंपळ, कडुलिंब यांसारख्या सावली देणाऱ्या देशी वृक्षांची लागवड करून ग्रीन कॉरिडॉर उभारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सासवड, नीरा, लोणंद, फलटण, नातेपुते, माळशिरस आणि पंढरपूर येथे बायपास रस्ते, उड्डाणपूल, रेल्वे ओव्हरब्रिज आणि अंडरपास तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे वाहतूक अधिक वेगवान आणि सुरक्षित झाली आहे.

विशेष म्हणजे या विकासकामांदरम्यान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ऐतिहासिक विहीर, बाजीराव विहीर यांसारख्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याचाही प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे आधुनिक विकास आणि ऐतिहासिक वारसा यांचा संतुलित संगम या मार्गावर पाहायला मिळतो.

**वारी : महाराष्ट्राच्या लोकमनाची जैविक परंपरा**

वारी ही फक्त पंढरपूरकडे जाणारी धार्मिक यात्रा नाही; ती महाराष्ट्राच्या लोकमनाची जैविक परंपरा आहे. यात समता आहे, सेवा आहे, श्रमसंस्कृती आहे, लोकशाही आहे आणि सामूहिकतेची अद्भुत ताकद आहे.

खडतर पायवाटांपासून आधुनिक राजमार्गापर्यंत आलेल्या या परंपरेने काळ बदलला, व्यवस्था बदलली, रस्ते बदलले; पण वारकऱ्यांच्या ओठांवरील ज्ञानोबा-तुकोबाचा गजर आजही तितक्याच श्रद्धेने आसमंतात घुमत आहे.

**- युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**

# निकालाचा संदेश



विदर्भ हा काँग्रेसचा बालेकिल्ला, ही इतिहासजमा झालेली ओळख. अमरावती मतदारसंघात काँग्रेसकडे ११९ मते असून देखील काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना एकही मत मिळाले नाही. विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकीत महायुतीने एकतर्फी विजय मिळवला. महाविकास आघाडीला आलेले अपयश महाराष्ट्राच्या आजच्या राजकीय चित्राचे नेमके दर्शन घडविणारे आहे. युतीकडून विजयाचा जल्लोष साजरा केला जात असला तरी तेथे सारे काही आलबेल आहे, असे मानण्याचे कारण नाही. नाशिकमध्ये भाजपचे बंडखोर गोकुळ गीते यांच्या विजयातून तोच संदेश गेला आहे. गेल्या वर्षी महापालिका, नगरपालिका आणि काही जिल्हा परिषदा, यांच्या निवडणुका झाल्या. भाजपचा आणि मित्र पक्षांचा विजय रथ विधानसभा निवडणुकीपासून दौडत आहे. महापालिका, नगरपालिका निवडणुकांमध्ये महायुतीने घोडदौड कायम ठेवली. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वर्चस्व प्रस्थापित झाल्याने विधान परिषद निवडणुकीत वेगळे चित्र पाहायला मिळेल, अशी अपेक्षा नव्हतीच. 'महायुतीची उमेदवारी म्हणजे यशाची खात्री' हे समीकरण बनल्याने उमेदवारीसाठी स्वाभाविकपणे मोठी चुरस होती. सत्ता आणि सत्तेच्या ताकदीचे दर्शन या निवडणुकीत झाले. एकूण जागा सतरा, त्यापैकी सहा जागांवर विरोधकांनी आधीच 'माघार' घेतली ! पुणे, अहिल्यानगर, ठाणे, कोकण, यवतमाळ, वर्धा- गडचिरोली- चंद्रपूर याठिकाणी निवडणूक बिनविरोध झाली.

नाशिकमधील निकाल अधिक चर्चेत आला आहे.

नेत्यांची निष्क्रीयता


नाशिकमधून विजयी झालेले गोकुळ गिते यांनी उमेदवारी मागे घेतल्याची घो-षणा केली होती, पण मतपत्रिकेवर अपक्ष म्हणून त्यांचे नाव होते आणि अर्थात, प्रचार मोहीम देखील! माघारीच्या घोषणेनंतरही निवडणुकीत विजय, हे अपवादात्मक उदाहरण. त्यांनी शिवसेनेच्या शिंदे गटाचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना पराभवाची धूळ चारली. गोकुळ गिते हे नाशिक महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती गणेश गिते यांचे बंधू आणि मंत्री गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय. या निवडणुकीत आपल्या विरोधात महाजन यांनी गितेंना ताकद दिली, असा थेट आरोप पराभूत उमेदवार दराडे यांनी केला आहे. निवडणुकीत ६१९ मतदारांपैकी ४७५ मते महायुतीची होती. त्यातील ३५७ मते गिते यांना मिळाली, यातच सर्व आले! विशेष म्हणजे विजयानंतर गोकुळ गिते यांनी शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे सहसदस्यत्व स्वीकारले. शिवसे-नेने विधानपरिषदेसाठी चुकीचा उमेदवार निवडला, अशी भूमिका घेत शिंदे सेनेला धोबीपछाड देण्याचा भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचा डाव होता. पण आपल्या अधिकृत उमेदवाराच्या पराभवानंतर गोकुळ गिते यांना सहसदस्यत्व देत शिवसेनेने तो डाव उलटवला. इतरवेळी सत्ताधार्यांच्या मनमानीबद्दल, त्यांच्याकडून वापरल्या जाणार्या आर्थिक ताकदीबद्दल विरोधी पक्षाचे नेते बोलत असतात, पण जिथे थेट 'युद्धा'चा प्रसंग येतो तेथे त्यापैकी अनेकांची तलवार म्यान होते. विधान परिषदेच्या या निवडणुकीत ते प्रकर्षाने दिसले. विदर्भातील काही काँग्रेस नेत्यांना पक्षाच्या नेतृत्वाने जाब विचारल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. उमेदवारीपासून प्रचारापर्यंत काही नेत्यांनी दाखव-लेली निष्क्रियता उघड झाली आहे. भाजपला या निवडणुकीत आव्हान देण्यासाठी विदर्भातील प्रमुख नेत्यांनी निवडणुकीच्या मैदानात उतरावे, अशी काँग्रेस पक्षश्रेष्ठांची इच्छा होती, असे सांगितले जाते. पण या भूमिकेला अजिबात प्रतिसाद दिला गेला नाही. यामुळे काँग्रेस नेतृत्व संतप्त आहे. सांगली- सातारा स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजपचे धैर्यशील कदम विजयी झाले असले तरी महाविकास आघाडीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांनी महायुतीची काही मते खेचून घेतली. महाविकास आघाडीचे संख्याबळ १९५ होते, प्रत्यक्षात जगताप यांना २९२ मते मिळाली. महाराष्ट्रात आज विरोधकांसमोर अस्तित्वाचे आव्हान आहे. ते पेलण्यासाठी आवश्यक असलेली इच्छाशक्ती विरोधकांमध्ये उरलेली नाही, हा आताच्या निवडणूक निकालाचा अर्थ. अंतर्गत संघर्षाचा समतोल साधत पुढे जाण्याची किमया महायुतीने साधली आहे. आजच्या राजकीय चित्रात खरेतर असा समतोल साधण्याची जबाबदारी विरोधी पक्षांची होती. त्यांच्यासाठी ती गरजही आहे, पण तात्कालिक प्रतिक्रिया देत शब्दांचे फुगे उडविण्याचा खेळ त्यांच्याकडून सुरू आहे.

# अभ्यास किंवा कामाच्या गोष्टी दीर्घकाळ लक्षात ठेवण्यासाठी

अभ्यास किंवा कामाच्या गोष्टी दीर्घकाळ लक्षात ठेवण्यासाठी सक्रिय वाचन, योग्य नियोजन (वेळापत्रक), आणि मेंदूला विश्रांती देणे सर्वात प्रभावी ठरते.दीर्घकाळ गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी आणि अभ्यास सुधारण्यासाठी येथे काही सोप्या टिप्स दिल्या आहेत:मोठ्या विषयांचे तुकडे करा: कोणताही मोठा धडा किंवा काम एकदम लक्षात ठेवण्याऐवजी त्याचे लहान-लहान भाग करा. यामुळे मेंदूवर ताण येत नाही.सक्रिय वाचन नुसते वाचण्याऐवजी, वाचलेला भाग बंद करून तो स्वतःला किंवा इतरांना शिकवण्याचा प्रयत्न करा. यामुळे माहिती दीर्घकाळ लक्षात राहते.योग्य वेळापत्रक (ठेींळपश): अभ्यासासाठी आणि कामासाठी एक निश्चित वेळ आणि शांत जागा निवडा. दररोज एकाच वेळी अभ्यास केल्यास सवय बनते.मेमरी ट्रिक्स कठीण मुद्दे किंवा मोठी उत्तरे लक्षात ठेवण्यासाठी महत्त्वाच्या शब्दांचे संक्षिप्त रूप तयार करा.स्मार्ट ब्रेक्स सलग तासभर अभ्यास न करता प्रत्येक ४५ मिनिटांनंतर ५-१० मिनिटांचा ब्रेक घ्या. यामुळे मेंदूची ताजी राहण्याची क्षमता वाढते.



# पोटऱ्या- मांड्यांचे स्नायू आखडले आहेत? जाणून घ्या स्नायूंच्या वेदनांमागील कारणे



पोटऱ्या मांड्याच्या स्नायूंमध्ये वाढलेल्या वेदना कमी करण्यासाठी घरगुती उपाय करावेत. यामुळे शरीराला सुद्धा फायदे होतात आणि वेदनांपासून सुटका मिळते. चला तर जाणून घेऊया स्नायूंमध्ये वेदना वाढण्याची कारणे.

पोटऱ्या- मांड्यांचे स्नायू आखडले आहेत?
जाणून घ्या स्नायूंच्या वेदनांमागील कारणे आणि घरगुती उपाय, नसांमध्ये वाढेल ताकद
पोटऱ्या- मांड्यांचे स्नायू आखडले आहेत?
जाणून घ्या स्नायूंच्या वेदनांमागील कारणे आणि घरगुती उपाय, नसांमध्ये वाढेल ताकद
पोटऱ्या मांड्याचे स्नायू सक्रिय करण्यासाठी उपाय:पोटऱ्या मांड्यांचे स्नायू कशामुळे आखडतात?
स्नायूंमध्ये वेदना कशामुळे वाढतात?

तासनतास एका जागेवर बसून राहणे, शारीरिक हालचाल न करणे, खूप जास्त चालणे, व्यायाम केल्यानंतर शरीरावर आलेला तणाव, पोषक घटकांची कमतरता इत्यादी अनेक गोष्टींच्या परिणामामुळे मांड्या आणि पोटऱ्यांमध्ये वेदना वाढू लागतात. काहीवेळा या वेदना तात्पुरता होतात, पण वय वाढल्यानंतर वेदना सतत जाणवू लागतात. ज्याच्या परिणामामुळे चालताना किंवा खाली बसताना तीव्र वेदना होतात आणि काहीच सुचत नाही. स्नायूंमध्ये वाढलेल्या वेदनांकडे कायमच दुर्लक्ष केले जाते. यामुळे वेदना कमी होण्याऐवजी आणखीनच वाढू लागतात. शरीरात पोषक घटकांचा अभाव निर्माण झाल्यामुळे तरुण वयात शरीरातील स्नायूंमध्ये ताण येण्याची शक्यता असते. हा ताण आणि वेदना कमी करण्यासाठी अनेक लोक बाजारात उपलब्ध असलेल्या पेनकिलरच्या गोळ्यांचे सेवन केले जाते. हाडांमध्ये किंवा स्नायूंमध्ये वाढलेल्या वेदना कमी करण्यासाठी वारंवार पेनिकलरच्या गोळ्यांचे सेवन करणे अजिबात चांगले नाही. यामुळे शरीराला हानी पोहचण्याची खूप जास्त शक्यता असते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला पोटऱ्या मांड्याचे स्नायू कशामुळे आखडतात? आखडलेले स्नायू शिथिल करण्यासाठी कोणते उपाय करावेत? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. हे उपाय केल्यास स्नायूंमध्ये वाढलेल्या वेदना कमी होतील आणि आराम मिळेल.चला तर जाणून घेऊया सविस्तर.पोटऱ्या मांड्यांचे स्नायू कशामुळे आखडतात?शरीरात पुरेसे पाणी नसणे. शरीरातील सोडिअम, पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअम यांसारख्या खनिजांचे प्रमाण कमी होणे.

खूप वेळ उभे राहणे, जास्त चालणे किंवा कठीण व्यायाम करणे.पायांमध्ये रक्तपुरवठा योग्य प्रकारे न झाल्यास पोटऱ्या मांड्यांचे स्नायू आखडण्याची शक्यता असते.पावसाळ्यात सर्दी खोकला टाळण्यासाठी आहारात अजिबात करू नका 'या' पदार्थांचा समावेश, अन्यथा उद्भवतील पोटाच्या गंभीर समस्या-पोटऱ्या मांड्याचे स्नायू सक्रिय करण्यासाठी उपाय:-पोटऱ्या किंवा मांड्यामध्ये वारंवार वेदना होत असतील तर कोमट पाण्याचा शेक घ्यावा. कोमट पाण्याचा शेक घेतल्यामुळे आखडलेले स्नायू शिथिल होतात आणि वेदनांपासून आराम मिळतो.

यासोबतच रक्तभिसरण सुधारण्यास मदत होते. कोमट पाण्यात भिजवलेला टॉवेल दुखत असलेल्या भागावर ठेवून काहीवेळ तसेच ठेवावे. याशिवाय आहारात केळी, दही, दूध, सुका मेवा, हिरव्या पालेभाज्या आणि कडधान्ये इत्यादी पदार्थांचा समावेश करावा. पोटॅशियम, कॅल्शियम आणि मॅग्नेशियमयुक्त पदार्थांचा समावेश केल्यास हाडे मजबूत होण्यास मदत होते. शरीर कायमच निरोगी ठेवण्यासाठी भरपूर पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. पाणी प्यायल्यामुळे शरीर हायड्रेट राहते आणि आरोग्य सुधारते. नारळपाणी, ताक किंवा फळांचा समावेश केल्यास शरीराला आवश्यक असलेले विटामिन मिळतात.

टीप - हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. पोटऱ्या आणि मांड्यांचे स्नायू आखडण्याची कारणे कोणती?

शरीरात पाण्याची कमतरता, इलेक्ट्रोलाइट्सचे असंतुलन, जास्त शारीरिक मेहनत, व्यायामाचा अभाव, स्नायूंवर ताण किंवा काही पोषक घटकांची कमतरता यामुळे स्नायू आखडू शकतात. स्नायू मजबूत ठेवण्यासाठी कोणते पदार्थ खावेत? प्रथिनेयुक्त पदार्थ, दूध व दुग्धजन्य पदार्थ, कडधान्ये, सुका मेवा, हिरव्या भाज्या आणि खनिजे असलेले पदार्थ आहारात समाविष्ट करणे उपयुक्त ठरू शकते.टींश: वारंवार स्नायूंमध्ये क्रॅम्प का येतात?-पी: पाण्याची कमतरता, शरी-रातील पोटॅशियम, मॅग्नेशियम किंवा कॅल्शियमचे प्रमाण कमी होणे, जास्त व्यायाम किंवा दीर्घकाळ एकाच स्थितीत राहणे यामुळे क्रॅम्प येऊ शकतात.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



यापुढेही समाजात मासिक पाळीविषयी अधिक प्रसार होणे गरजेचे आहे. त्यामुळे समाजात अधिक सकारात्मक वातावरण निर्माण होईल,फ असं ती सांगते. ठाण्यात सखी ही संस्था शालेय विद्यार्थ्यांना मासिक पाळीविषयी माहिती देण्याचं काम करत आहे. ङ्गया विद्यार्थ्यांना मासिक पाळीमुळे स्त्रियांच्या आयुष्यात होणाऱ्या बदलांची माहितीही देण्यात येते. त्याचबरोबर तज्ज्ञांच्या मदतीने या विषयाबद्दल मुलींसोबत मनमोकळा संवाद साधण्यात येतो. त्यामुळे मासिक पाळी हा गंभीर विषय मुलांना समजण्यास अधिक सोपा जातो. तसेच त्यांना योग्य वयात योग्य माहिती मिळते,फ असे या संस्थेच्या डॉ. लता घनशामनी यांनी


## २ Joke — विनोद




अरुण : कोंबडीला तू गरम गरम पाण्याने आंघोळ का घालतोस रोज रोज?

वरुण : तिने उकडलेले अंडे द्यावे म्हणून.

## ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- **डॉन प्याट**


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. हत्तीवरीक बैठक
३. गरजू
७. हुक्की, लहर
१०. पाणी
११. जाणूनबुजून
१२. माणशी प्रमाण
१४. पाठवणी
१६. नकला करणारा
१७. मालक
१८. एक धान्यप्रकार, गहू-हरभरा डाळीचे एकत्र पीठ-त्याचे शिजवलेले पौष्टिक मिश्रण
१९. हात
२०. वेळ, अवधी
२१. शेतमळ्यांचा मालक
२४. म्हातारपण व मृत्यू नसलेला
२७. एक लाल कंदमूळ
२९. तळे
३१. प्रतिकूल स्थितीत झालेली पांगापांग
३४. बडबड
३७. किराणा व्यापारी
३८. वेल
४०. तड लागेपर्यंत (जेवणे)
४१. वर्ष, साल
४२. खंदक
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. बैलाच्या मानेवरील जोखड
४६. घट्ट बासुंदी
४८. पार्थिवावरचे वस्त्र
५०. नूतन, नवे
५२. श्वसनाचा अवयव
५३. लाकडाची एक उत्कृष्ट जात
५५. भांडण सोडवणारा मध्यस्थ
५७. जीभ
५९. दोन कानांचे तळण्याचे पात्र
६१. येरझार
६४. पार्वतीचे नाव
६५. पोते
६८. दिलेला ठराविक काळ
६९. दुःख (हिंदी)
७०. प्रत्येक वर्षी
७१. बगीचा
७३. छोटी घागर
७५. बायको
७६. निमंत्रक (स्त्री)
७९. कच्चे लिखाण (इंग्रजी)
८१. रांग, पंक्ती
८२. घर
८३. वृक्षाच्या आधाराने वाढणारी
८४. उदर
८५. धपाटा
८६. मरुणझुणुच्या ---, जा रे माझ्या माहेराफ
८८. जमिनीखाली येणारे फळ
८९. निराळा
९०. छोटे कुबड
९१. फालतू सामान

## उभे शब्द

१. काजळ
२. लहान मूल
३. विश्वासघातकी
४. दारूचा प्रकार
५. नमनीय
६. छोटी होडी
७. सखी, मैत्रिण
८. करणी, उपद्व्याप (हिंदी)
९. माळी
११. ठेकेदार
१३. अक्कलहुशारीने वागणारा
१५. सिंहाचे भारतातील अभयारण्य येथे आहे
१७. धमकी, घातलेली भीती
१८. मलई
२२. हवेतील थंडावा
२३. औदार्य, देण्याची वृत्ती
२५. कमळ
२६. रममाण, गुंग
२७. बेसावध
२८. अभयदान
३०. भांडणे लावणे
३२. घाई, त्वरा
३३. शंकर
३४. धाक, भीती
३५. आवरण
३६. रोखलेली नजर
३९. तारणारा
४४. अंतःकरण
४७. संताप
४९. नवीन आलेला
५१. मऊ
५२. विविध
५३. शिर्डीचे संत
५४. वचन, मुदतविषयीचा करार
५६. दीर्घ श्वास
५८. कायदेशीर
५९. जास्तीत जास्त
६०. गट, लोकांचा समूह
६२. फणा काढणारा सर्प
६३. रहस्य
६४. सोडलेला श्वास
६६. उबदार पांघरुण (इंग्रजी)
६७. दृष्टीभेट
७२. बाणेदार
७४. लाटण्याचा साथीदार
७५. न्याय, प्रशंसा
७७. ढग (संस्कृत)
७८. आई
८०. अंतर, तफावत
८२. सोन्या-चांदीचा व्यापारी
८४. बैलाचा सण
८७. आवाजातील घोगरेपणा

## आडवे उत्तर

१.अंबारी ३.गरजवंत ७.सणक १०.जल ११.मुद्दाम १२.दरडोई १४.रवानगी १६.नकलाकार १७.धनी १८.सातू १९.कर २०.समय २१.बागायतदार २४.अजरामर २७.गाजर २९.तलाव ३१.वाताहत ३४.वटवट ३७.वाणी ३८.लता ४०.तट्ट ४१.सन ४२.चर ४३.कमला ४५.जू ४६.रबडी ४८.कफन ५०.नवीन ५२.नाक ५३.सागवान ५५.लवाद ५७.रसना ५९.कढई ६१.गमनागमन ६४.उमा ६५.बारदान ६८.मुदत ६९.गम ७०.दरसाल ७१.बाग ७३.कळशी ७५.दारा ७६.यजमानीण ७९.रफ ८१.बाग ८२.सदन ८३.लता ८४.पोट ८५.रट्टा ८६.पाखरा ८८.कंद ८९.वेगळा ९०.पोक ९१.सटरफटर

## उभे उत्तर

१.अंजन २.बालक ३.गद्दार ४.रम ५.वंदनीय ६.तर ७.सई ८.करतूत ९.बनकर ११.मुकादम १३.डोकेबाज १५.गीर २३.दानत २५.राजीव २६.रत २७.गाफील २८.जीवनदान ३०.लावालावी ३२.तातडी ३३.हट्ट ३४.वचक ३५.टरफल ३६.टक ३९.तारणहार [illegible]गत ५१.नरम ५२.नाना ५३.साईबाबा ५४.वायदा ५६.दम ५८.समदशीर ५९.कमाल ६०.समुदाय ६२.नाग ६३.गमक ७२.मानी ७४.पोळपाट ७५.दाद ७७.जलद ७८.माता ८०.फरक ८२.सराफ ८४.पोळा ८७.खर



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### हॅरी केनवर काळी जादू? सोपे गोलही चुकले!

मुंबई,–फुटबॉल विश्वचषक हा त्यांच्या सामन्यांपेक्षा जास्त स्पर्धेत होणाऱ्या वाद हे सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेत आहेत. मागील काही दिवसांमध्ये विश्वचषकातील अनेक सामन्यांनी चाहत्यांचे भरपूर मनोरंजन केले आहे. आता फुटबॉल विश्वचषकामध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इंग्लंड विरुद्ध घाना यांच्यामध्ये सामना पार पडला हा सामना अनिर्णयित राहिला, यासामन्यात आता इंग्लंडवर जादूटोणा केल्याचा आरोप केला जात आहे. या सामन्यापेक्षा जास्त सध्या सोशल मिडियावर एका मांत्रिकाचे नाव मोठ्या प्रमाणात चर्चेत पाहायला मिळत आहे. दोन्ही संघांनी या सामन्यात एकही गोल केला नाही, सामन्याच्या अंतिम वेळी इंग्लंडच्या हॅरी केनने रिबाउंड शॉट मारण्यात मोठी चूक केली आणि त्यामुळे इंग्लंडच्या संघाचा विजय हुकला. इंग्लंडच्या खेळाडूवर काळी जादू केल्याचा आरोप केला जात आहे आणि त्याचे अनेक व्हिडिओ देखील सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. इंग्लंडच्या हॅरी केनने जेव्हा गोल मारण्याचा प्रयत्न केला त्यावेळी तो चेंडू प्रेक्षकांमध्ये गेला. यावेळी एक व्हिडिओ फिरत आहे आणि एका इंग्लिश चाहत्याने त्याच्या शेजारी बसलेल्या घानाच्या चाहत्याला गंमतीने म्हटले की, जणू काही जादूच काम करत आहे.

### मॅट हेन्रीने इतिहास घडवला!

मुंबई–आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जाहीर केलेल्या ताज्या कसोटी क्रमवारीत एक ऐतिहासिक बदल दिसून आला आहे. कसोटी क्रिकेटला गोलंदाजीमध्ये एक नवीन मनंबर–१फगोलंदाज मिळाला असला, तरी भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने आपलं अव्वल स्थान कायम राखलं आहे. आयसीसीच्या या महत्त्वपूर्ण अपडेटमुळे कसोटी प्रकाराला दोन वर्ल्ड नंबर वन गोलंदाज मिळाले आहेत. यासह त्याने ३६ वर्षांनंतर अशी कामगिरी करणारा पहिला गोलंदाज होण्याचा मान मिळवला आहे.लंडनच्या मद ओव्हलफमैदानावर इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात घातक गोलंदाजी करत ११ बळी घेण्याच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीला मोठे यश मिळाले आहे. ३४ वर्षीय हेन्रीने आयसीसी (घ्ण्ण) कसोटी गोलंदाजी क्रमवारीत थेट अव्वल स्थान गाठले आहे. विशेष म्हणजे, हेन्रीने जसप्रीत बुमराहला पहिल्या स्थानावरून हटवलेले नाही; त्याऐवजी, तो आता बुमराहसोबत संयुक्तपणे अव्वल क्रमांकाचा कसोटी गोलंदाज बनला आहे. लंडनच्या मद ओव्हलफमैदानावर इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भेदक गोलंदाजी करत ११ बळी घेण्याच्या ऐतिहासिक कामगिरीचं मॅट हेन्रीला मोठं बक्षीस मिळालं आहे.

### रणजी ट्रॉफी प्लेअरचा एन्काऊंटर,युवराजचा टीममेट क्रिमिनल कसा बनला?

मुंबई–क्रिकेट वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. रणजी ट्रॉफी खेळलेल्या एका माजी क्रिकेटपटूचा एन्काऊंटर झाल्याची घटना घडली आहे.सतपाल उर्फ सत्तु असे त्या माजी रणजी क्रिकेटपटूचे नाव आहे. एका जंगलात पोलिसांनी त्याचा एन्काऊंटर केला आहे.टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंहसोबत त्याने रणजी ट्रॉफी खेळली होती. दरम्यान माजी क्रिकेटपटू सतपालचा पोलिसांनी एन्काउंटर का केला? आणि क्रिकेट सोडून तो गुन्हेगारी क्षेत्राकडे का वळला? हे जाणून घेऊयात.उत्तर प्रदेशच्या मुजफ्फरनगरमधील लुधियाना पोलिसांच्या कस्टडीतून सतपाल फरार झाला होता. त्याच्यावर २५ हजाराच बक्षीस होतं. सोमवारी पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत त्याचा एन्काऊंटर झाला होता. त्याचं झालं असं की एन्काऊंटरमध्ये सतपालच्या दोन्हीही पायांना गोळी लागली होती त्यामुळे तो गंभीर जखमी झाल होता. त्यानंतर रुग्णालयात उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला होता.सतपास सिंह उर्फ सत्तु कधीकाळी क्रिकेटमध्ये करिअर करण्याच स्वप्न पाहत होता. वेगवान गोलंदाज असलेला सत्तूने १९९६ मध्ये मोहाली आणि जालंधरकडून दोन रणजी मॅच खेळले होते.

### वैभव सूर्यवंशी खरंच २१-२२ वर्षाचाः पाक क्रिकेटर

मुंबई–पाकिस्तानचे खेळाडू आणि पाकिस्तानचा संघ हा सातत्याने चर्चेत आहे. भारतीय संघ आता आगामी मालिका आयर्लंडविरुद्ध होणार आहे त्यासाठी टीम इंडिया आयर्लंडला पोहोचली आहे. टीम इंडिया आता दोन सामने आयर्लंडविरुद्ध खेळणार आहे, त्यानंतर टीम इंडिया इंग्लंडविरुद्ध दोन मालिका खेळणार आहे. सुरुवातीच्या दोन्ही सामन्यामध्ये भारताच्या संघात वैभव सूर्यवंशीची निवड झाली आहे. मागील काही महिन्यांपासून सातत्याने वैभव सूर्यवंशीच्या वयावर अनेक प्रश्न सोशल मिडियावर उपस्थित केले जात आहेत. नुकतीच वैभव सूर्यवंशीने श्रीलंकेमध्ये भारताच्या संघाने जिंकलेल्या ट्राय सिरीजचा तो भाग होता. त्याने या स्पर्धेच्या फायनलमध्ये धुमाकुळ घातला.वैभवने भारत अ विरुद्ध श्रीलंका अ सामन्यात भारतासाठी ११ चेंडूत अर्धशतक झळकावले. त्यानंतर आता टीम इंडिया आयर्लंड मालिकेसाठी गेल्यानंतर पाकिस्तानच्या माजी क्रिकेट खेळाडूने धक्कादायक दावा केला आहे. पाकिस्तानचा माजी खेळाडू तन्वीर अहमदने बिहारचा हा खेळाडू २१–२२ वर्षाचा असल्याचा दावा केल्याने सोशल मीडियावर खळबळ उडाली.

# उद्या करो या मरो! सेमीफायनलसाठी भारताला बांग्लादेशविरुद्ध विजय आवश्यक

भारत आणि बांग्लादेशचा संघ आतापर्यंत २३ सामने खेळले आहेत. त्यामध्ये भारताचा संघ वरचढ ठरला आहे. भारताने बांग्लादेशविरुद्ध २३ पैकी तब्बल २० सामने जिंकले आहेत.

खछऊथ ती इ–छ थ: उद्या करो या मरो! सेमीफायनलसाठी भारताला बांग्लादेशविरुद्ध विजय आवश्यक

उद्या भारत विरुद्ध बांग्लादेश आमनेसामने (फोटो– सोशल मीडिया)

उद्या भारत अन् बांग्लादेशचे संघ येणार आमनेसामने

सेमीफायनलमध्ये जण्यासाठी भारताला विजय आवश्यक

साऊथ आफ्रिकेविरुद्ध भारताला स्वीकारावा लागला पराभव

सध्या इंग्लंडमध्ये आयसीसी महिला टी २० वर्ल्डकप स्पर्धा सुरू आहे. उदय भारताचा महत्वाचा सामना बांग्लादेशविरुद्ध होणार आहे. उद्याचा सामना भारतीय महिला क्रिकेट संघासाठी अत्यंत महत्वाचा असणार आहे. सेमीफायनलमध्ये जाण्यासाठी भारतीय संघाला उद्याचा सामना जिंकणे अत्यंत आवश्यक असणार आहे. भारतीय संघ सध्या पॉईंट्स टेबलमध्ये ४ पॉईंट्ससह दुसऱ्या स्थानावर आहे.काय




सांगतो हेड टू हेड रेकॉर्ड? भारत आणि बांग्लादेशचा संघ आतापर्यंत २३ सामने खेळले आहेत. त्यामध्ये भारताचा संघ वरचढ ठरला आहे. भारताने बांग्लादेशविरुद्ध २३ पैकी तब्बल २० सामने जिंकले आहेत. त्यामुळे भारतीय संघाचे पारडे मजबूत दिसून येत आहे. टी २० वर्डकपमध्ये भारत आणि बांग्लादेशमध्ये ३ वेळेस आमनेसामने आले आहेत. तीनही सामने भारताने जिंकले आहेत. त्यामुळे उद्याच्या सामन्यात भारतीय संघाचे पारडे जड दिसून येत आहे.मागील सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारतीय संघाचा पराभव केला होता. या सामन्यात भारतीय गोलंदाजांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे भारताला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे उद्याचा सामना भारतीय संघाला उद्याचा सामना जिंकणे आवश्यक आहे. त्यामुळे उद्याचा सामना अत्यंत रोमांचक होण्याचा अंदाज आहे.

सध्या इंग्लंडमध्ये आयसीसी महिला टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धा सुरू आहे. भारतीय महिला संघ ग्रुप २ मधून खेळत आहे. तीन पैकी दोन सामन्यात भारताने विजय प्राप्त केला आहे. तर कालच्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात त्यांना पराभव स्वीकारावा लागला आहे.

मात्र या तीनही सामन्यांमध्ये श्री चरणी या स्पिनरने अचूक अन् भेदक गोलंदाजी करत आपल्या नावावर नवा रेकॉर्ड केला आहे.कालच्या सामन्यात साऊथ आफ्रिकेने भारताचा पराभव केला आहे. या सामन्यात भारताची फिरकीपटू श्री चरणीने शानदार गोलंदाजी केली. तिने कालच्या सामन्यात २४ रन्स देत ३ विकेट्स पटकावल्या. त्यामुळे भारताचा पराभव झाला असला तरी हा सामना शेवटपर्यन्त नेण्यात भारतीय संघाला यश आले. दरम्यान तीन सामन्यात श्री चरणीने शानदार गोलंदाजी करत नवा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

भारत: शफाली वर्मा, स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, रिचा घोष (यष्टीकीपर), यास्तिका भाटिया, हरमनप्रीत कौर (कर्णधार), दीप्ती शर्मा, प्रेमा रावत, श्री चरणी, क्रांती गौड, नंदनी शर्मा.

## वैभव सूर्यवंशीच्या धाकट्या भावाची तुफानी खेळी, आशीर्वाद सूर्यवंशीने वेधले लक्ष!





मुंबई–वैभव सूर्यवंशीने ट्राय सिरीजमध्ये केलेल्या कामगिरीची चर्चा संपूर्ण जगभरामध्ये केली जात आहे. त्याने आयपीएलमध्ये देखील केलेल्या दमदार कामगिरीनंतर तो आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. आयपीएलमध्ये केलेल्या कामगिरीनंतर त्याला भारतीय संघामध्ये देखील स्थान मिळाले आहे. तो सध्या भारतीय संघासोबत आयर्लंडविरुद्ध मालिकेसाठी आयर्लंडला आहे. त्याआधी आता वैभव सूर्यवंशी भारतीय संघासोबत असताना आता त्याचा धाकटा भाऊ आशीर्वादने त्याच्या फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. मोतीपूर गावात राहणाऱ्या सूर्यवंशी कुटुंबातून क्रिकेटचा आणखी एक स्टार उदयास येत आहे.


वैभव सूर्यवंशीने त्याच्या कामगिरीने आयपीएलमध्ये स्थान मिळवले आणि आयपीएलमध्ये केलेल्या कामगिरीनंतर त्याचे जगभरामध्ये नाव झाले आहे. आता वैभवच्या धाकट्या भावाने पुन्हा कौतुकास्पद कामगिरी केली आहे. आशीर्वाद सूर्यवंशीने त्याच्या स्फोटक खेळीमुळे तो पुन्हा चर्चेचा विषय ठरला आहे. त्याने ८७ चेंडूंमध्ये १०३ धावा करून आपले कौशल्य दाखवले होते. एका स्थानिक स्पर्धेमध्ये त्याने ऋषभ–११ गंगापूर (समस्तीपूर) संघाकडून खेळताना आशीर्वाद सूर्यवंशीने दमदार फलंदाजी केली. त्याने या सामन्यात ११९ चेंडूमध्ये १६८ धावा केल्या, यामध्ये त्याने १९ चौकार आणि ६ षटकार मारले. त्याने केलेल्या कामगिरीनंतर वैभवने भावासाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. .वैभव सूर्यवंशीने त्याच्या धाकट्या भावाने केलेल्या कामगिरीनंतर त्याने त्याचे सोशल मिडियावर कौतुक केले आहे. त्याने त्याच्या भावाचा बॅटसोबतचा फोटो शेअर केला आहे आणि टाळ्या वाजवण्याचा इमोजी शेअर केला आहे. त्याचबरोबर काका, राजीव सूर्यवंशी यांनी आशीर्वादच्या प्रभावी कामगिरीबद्दल आनंद व्यक्त केला आणि सांगितले की आशीर्वादमध्ये प्रतिभेची कमतरता नाही. ते म्हणाले, ''तो ज्या प्रकारे सातत्याने मेहनत करतो आणि मैदानावर कामगिरी करतो, त्याचा संपूर्ण कुटुंबाला अभिमान आहे. आम्हाला खात्री आहे की भविष्यात तो क्रिकेटमध्ये नवीन उंची गाठेल आणि समस्तीपूर, बिहार तसेच देशाला गौरव मिळवून देईल.''

आशीर्वाद सूर्यवंशीने त्याच्या खेळीने सर्वांचे लक्ष वेधले आहे, त्याच्या सातत्याने चांगल्या कामगिरीनंतर क्रिकेट जगताला लवकरच सूर्यवंशी घराण्यातून आणखी एक मोठे नाव पाहायला मिळेल असा अंदाज लावला जात आहे. वैभव सूर्यवंशी मागील काही महिन्यांमध्ये त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याची कामगिरी दाखवली आहे. त्याचप्रमाणे आशीर्वादही आपल्या बॅटने भविष्यात आपली मजबूत छाप पाडत आहे.

## न्यूझीलंडचे माजी क्रिकेटपटू बॉब ब्लेअर यांचे ९४ व्या वर्षी निधन

वेलिंग्टन–न्यूझीलंडचे माजी वेगवान गोलंदाज बॉब ब्लेअर यांचे त्यांच्या ९४ व्या वाढदिवशी निधन झाले आहे. त्यांच्या आयुष्यातील एका दुर्दैवी रेल्वे अपघाताच्या पार्श्वभूमीवर दाखवलेली धिरोदात्त वृत्ती क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात प्रेरणादायी कथांपैकी एक मानली जाते.मिळालेल्या माहितीनुसार, ब्लेअर यांनी १९५३ ते १९६४ या काळात न्यूझीलंडसाठी १९ कसोटी सामने खेळले आणि ३५.२३ च्या सरासरीने ४३ बळी घेतले. त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात भावूक आणि ऐतिहासिक क्षण डिसेंबर १९५३ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या जोहान्सबर्ग कसोटीत पाहायला मिळाला. त्या काळात, ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला १९५३ मध्ये न्यूझीलंडमध्ये 'टँगिव्हाई रेल्वे दुर्घटना' घडली होती. वेलिंग्टन ते ऑकलंड एक्स्प्रेसचा रेल्वे पूल कोसळल्याने झालेल्या या भीषण अपघातात १५१ जणांचा मृत्यू झाला होता, ज्यात ब्लेअर यांच्या मंगेतर नेरिसा लव्ह यांचाही समावेश होता.

दोन दिवसांनंतर, जोहान्सबर्ग कसोटीच्या वेळी ब्लेअर हॉटेलमध्ये (अीं िंहश इश्ररळी हींश) शोक



करत होते. न्यूझीलंडची नववी विकेट पडल्यावर डाव संपला असे सर्वांना वाटले होते, परंतु त्या वेळी ब्लेअर अचानक पॅव्हेलियनमधून बाहेर आले आणि फलंदाजीसाठी मैदानावर उतरले. त्यांच्यासोबत बर्ट सटक्लिफ होते, ज्यांना दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज नील अॅकोकच्या चेंडूवर डोक्याला गंभीर दुखापत झाली होती, तरीही ते पुन्हा फलंदाजीला आले होते. या जोडीने शेवटच्या विकेटसाठी ३३ धावांची धिरोदात्त भागीदारी केली. ब्लेअर यांनी ६ धावा केल्या, तर सटक्लिफ ८० (८०) धावांवर नाबाद राहिले. कसोटी इतिहासातील ही सर्वात धाडसी खेळी मानली जाते. वैयक्तिक दु:खाच्या काळातही ब्लेअर यांनी दाखवलेली जिद्द आणि खिलाडूवृत्ती आजही सर्वांच्या स्मरणात आहे. २०२४ मध्ये न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेच्या विजेत्याला देण्यात येणाऱ्या 'टँगिव्हाई शील्ड'द्वारे या ऐतिहासिक घटनेचे स्मरण केले जाते.न्यूझीलंड क्रिकेटचे अंतरिम मुख्य कार्यकारी ग्रॅहम पार्क्स यांनी श्रद्धांजली अर्पण करताना म्हटले की, ''ब्लेअर यांची कथा दोन्ही देशांतील क्रिकेटच्या इतिहासात कायमस्वरूपी कोरली गेली असून, ती खेळातील धैर्याचे आणि एकजुटीचे प्रतीक आहे.'' प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ब्लेअर यांनी ११९ सामन्यांत ५३७ बळी घेतले. १९६४ मध्ये निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी ऑस्ट्रेलिया, झिम्बाब्वे, दक्षिण आफ्रिका, उत्तर आयर्लंड आणि इंग्लंडमध्ये प्रशिक्षक म्हणून काम केले. नंतर ते आपली पत्नी बार्बरा यांच्यासोबत चेशायरमध्ये स्थायिक झाले. बॉब ब्लेअर यांच्या निधनाबद्दल आदरांजली म्हणून, नॉटिंगहॅम येथे इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या तिसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी न्यूझीलंडचा संघ काळी पट्टी बांधून खेळणार आहे.

# गोल करत ख्रिस्तियानो रोनाल्डोचा २०२६ मध्ये नवा जागतिक विक्रम

पोर्तुगालचा संघ फिफा विश्वचषकात (ऋखऋ- थेीश्रव र्उीि २०२६) कमबॅक करण्याचा प्रयत्न करत आहे. ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या दोन गोलांच्या जोरावर पोर्तुगालने उझबेकिस्तानचा ५–० असा पराभव केला. या सामन्यात रोनाल्डोने अगदी सुरुवातीच्या मिनिटांतच पोर्तुगालला आघाडी मिळवून दिली आहे. रोनाल्डोने (उीळींळरपे ीपरश्रवे) सहाव्या मिनिटाला गोल करून संघाला १–० अशी आघाडी मिळवून दिली. फिफा विश्वचषकातील रोनाल्डोचा हा १०वा गोल होता. ख्रिस्तियानो रोनाल्डोसाठी हा एक ऐतिहासिक गोल असून, यासोबतच त्याने आपल्या नावावर एक विश्वविक्रमही नोंदवला आहे. सहा विश्वचषकांमध्ये गोल करणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे.

६ विश्वचषकांमध्ये गोल करणारा रोनाल्डो पहिला खेळाडू

पोर्तुगालचा ख्रिस्तियानो रोनाल्डो सहा विश्वचषकांमध्ये गोल करणारा जगातील एकमेव खेळाडू ठरला आहे. मंगळवारी (दि. २३ जून) रोजी उझबेकिस्तानविरुद्ध सामन्यात सहाव्या मिनिटाला गोल करून त्याने हा विक्रम केला. ४१ वर्षीय रोनाल्डोने २०१०, २०१४, २०१८, २०२२ आणि आता आपल्या सहाव्या विश्वचषक स्पर्धेत गोल करून






इतिहास रचला. यापूर्वी कोणत्याही पुरुष फुटबॉलपटूला सलग सहा विश्वचषक स्पर्धांमध्ये गोल करता आले नव्हते. सहा विश्वचषकांमध्ये गोल करून त्याने अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीला मागे टाकले आहे. मेस्सीने (ङळेपशश्र चशीीळ) २००६, २०१४, २०१८, २०२२ आणि २०२६ च्या विश्वचषकांमध्ये गोल केले आहेत. मात्र, २०१० च्या विश्वचषकात त्याला गोल करता आला नाही. ह्यूस्टन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात पोर्तुगालने उझबेकिस्तानचा ५–० ने पराभव केला. या गोलमुळे रोनाल्डो फिफा विश्वचषकाच्या इतिहासात पोर्तुगालचा सर्वाधिक गोल करणारा खेळाडू बनला आहे. त्याने या बाबतीत युसेबियोची बरोबरी केली आहे. १९६६ च्या विश्वचषकात युसेबियोने एकूण ९ गोल केले होते. तर दुसरीकडे, रोनाल्डोने आता पोर्तुगालसाठी १० गोल करून या बाबतीत युसेबियोला मागे टाकले आहे. रोनाल्डोने हे गोल २००६ ते २०२६ च्या विश्वचषकांदरम्यान केले आहेत. रोनाल्डोने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. रोनाल्डोने सहाव्या मिनिटात गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. रोनाल्डोने आपली प्रभावी कामगिरी सुरूच ठेवली आणि पहिल्याच हाफमध्ये आपला दुसरा गोल केला. रोनाल्डोने ३९ व्या मिनिटाला एक शानदार गोल करून संघाला उझबेकिस्तानविरुद्ध ३–० अशी आघाडी मिळवून दिली. नुनो मेंडेसने १७ व्या मिनिटाला पोर्तुगालसाठी दुसरा गोल केला. पहिल्या हाफच्या समाप्तीपूर्वी काही सेकंद आधी रोनाल्डो आपला तिसरा गोल करण्याच्या अगदी जवळ होता, पण त्याची संधी हुकली. दुसऱ्या हाफमध्ये, उझबेकिस्तानच्या अब्दुखोदिर खुसानोव्हने केलेल्या आत्मघाती गोलमुळे पोर्तुगालला ४–० अशी आघाडी मिळाली. पोर्तुगालच्या ब्रुनो फर्नांडिसने कॉर्नर किक मारली आणि गोलपोस्टजवळ उभ्या असलेल्या खुसानोव्हच्या डोक्याला लागताच चेंडू गोलपोस्टच्या बाहेर गेला. यानंतर, पोर्तुगालने पाचवा गोल करून उझबेकिस्तानविरुद्ध आपली आघाडी अधिक मजबूत केली. ८७ व्या मिनिटाला राफेल लिओने पोर्तुगालसाठी पाचवा गोल केला. सामन्याच्या अखेरपर्यंत उझबेकिस्तानचा संघ एकही गोल करू शकला नाही.सामन्यानंतर रोनाल्डो म्हणाला, ख I इरलज्ञ 'मी परत आलो आहे'. मागील सामन्यात रोनाल्डोला गोल करता आला नव्हता, पण या सामन्यात त्याने दमदार कामगिरी करण्यात यश मिळवले. उझबेकिस्तान संघाचा प्रवास गट फेरीतच थांबला. रोनाल्डो व्यतिरिक्त, नुनो मेंडेस आणि राफेल लिओने पोर्तुगालसाठी प्रत्येकी एक गोल केला.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयमध्ये २५ जूनला पाचव्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** :महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सीईटी सभागृहात गुरुवार दि. २५ जून २०२६ रोजी स. ११ वा. पाचव्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून लातूरचे खासदार डॉ.शिवाजी काळगे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील प्र-कुलगुरू डॉ.अशोक महाजन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माजी व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हासबे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी विचारमंचावर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य प्रो. डॉ.सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, आयक्यूएसी समन्वयक प्रो.डॉ.आनंद शेवाळे आणि परीक्षा प्रमुख प्रा.डॉ.सदाशिव दंदे यांची उपस्थिती राहणार आहे.

या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाला मागील शैक्षणिक वर्षातील पदवी आणि पदव्युत्तर माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित राहून प्रमाणपत्र आणि सन्मान स्वीकारण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, आयक्यूएसी समन्वयक प्रो.डॉ.आनंद शेवाळे, परीक्षा प्रमुख प्रा.डॉ.सदाशिव दंदे यांची आणि संयोजन समितीतील सदस्यांनी केले आहे.

# पुणे मुख्य टपाल कार्यालयात समर्पित आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग केंद्र व पार्सल पॅकेजिंग युनिटचे उद्घाटन




**पुणे/प्रतिनिधी:** दि. २३ जून २०२६ : ग्राहकांच्या सोयीसुविधा आणि सेवा उत्कृष्टता वाढविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पुणे मुख्य टपाल कार्यालयातील समर्पित आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग केंद्र व पार्सल पॅकेजिंग युनिट चे उद्घाटन आज प्रमुख पाहुण्या सौ. प्रीती अग्रवाल, पोस्टमास्तर जनरल, पुणे क्षेत्र, पुणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. समीर महाजन, वरिष्ठ अधीक्षक टपाल कार्यालये, पुणे शहर पूर्व विभाग उपस्थित होते.

नवीन सुविधेचे संपूर्ण नूतनीकरण करण्यात आले असून आधुनिक व ग्राहकाभिमुख वातावरण निर्माण करण्यात आले आहे. या सुधारित केंद्रामध्ये प्रशस्त जागा, प्रतीक्षालय, ग्राहक विश्रांती कक्ष (Customer Lounge), बसण्याची व्यवस्था, ग्राहकांसाठी सुधारित सुविधा, सुबक सेवा काउंटर, कार्यक्षम कार्यक्षेत्र नियोजन तसेच ग्राहकांना पार्सल व लॉजिस्टिक सेवा सहज आणि आनंददायी पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या केंद्राचे कामकाजाचे तास सकाळी ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत वाढविण्यात आले आहेत. तसेच या केंद्रामध्ये डाक निर्यात केंद्र (DNK) साठी स्वतंत्र काउंटरची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

हे समर्पित आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग केंद्र व पार्सल पॅकेजिंग युनिट देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वस्तूंचे सुरक्षित पॅकेजिंग व पाठवणी करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ई-कॉमर्स, व्यावसायिक मालवाहतूक व वैयक्तिक पार्सल सेवांच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा ग्राहक समाधान व कार्यक्षमता अधिक बळकट करेल, अशी अपेक्षा आहे.

गेल्या तीन आर्थिक वर्षांत पुणे मुख्य टपाल कार्यालयाच्या पार्सल व्यवसायात सातत्याने उल्लेखनीय वाढ झाली आहे. पुणे मुख्य टपाल कार्यालयातून दररोज सरासरी ७४ आंतरराष्ट्रीय पार्सल विविध देशांमध्ये पाठविले जातात. तसेच दररोज सरासरी ६९ ग्राहक पॅकेजिंग सुविधेचा लाभ घेत असून त्यातून सुमारे ९६,२४२/- इतके उत्पन्न मिळते. याशिवाय, पुणे मुख्य टपाल कार्यालयातील डाक निर्यात केंद्रामध्ये दररोज सरासरी १२ बुकिंग्स होतात, ज्यातून सुमारे २५,६७६/- इतके उत्पन्न प्राप्त होते. ही आकडेवारी इंडिया पोस्टच्या विश्वासार्ह, सुरक्षित आणि किफायतशीर लॉजिस्टिक नेटवर्कवरील ग्राहकांचा वाढता विश्वास दर्शवते.

पुणे मुख्य टपाल कार्यालयाव्यतिरिक्त, पुणे शहर पूर्व विभागांतर्गत चिंचवड पूर्व मुख्य टपाल कार्यालय आणि मार्केट यार्ड उप टपाल कार्यालय येथेही सकाळी ९.०० ते रात्री ९.०० या वेळेत समर्पित डाक निर्यात केंद्र व पार्सल पॅकेजिंग युनिट सेवा उपलब्ध आहेत. निकट भविष्यात हडपसर आयई उप टपाल कार्यालय आणि इन्फोटेक पार्क उप टपाल कार्यालय येथेही अशाच सुविधा सुरू करण्याचे नियोजन आहे.

यावेळी बोलताना पोस्टमास्तर जनरल सौ. प्रीती अग्रवाल यांनी विभागाच्या पायाभूत सुविधा व ग्राहक सेवा सातत्याने उन्नत करण्याच्या वचनबद्धतेवर भर दिला. त्यांनी सांगितले की, समर्पित आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग केंद्र व पार्सल पॅकेजिंग युनिट हे पुणेकर नागरिकांना जागतिक दर्जाच्या टपाल व लॉजिस्टिक सेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

गेल्या १७० वर्षांहून अधिक काळ टपाल विभाग हा केवळ सेवा प्रदाता नसून लोक, व्यवसाय आणि समुदायांना जोडणारा विश्वासू सहकारी राहिला आहे. इंडिया पोस्टवर लाखो ग्राहकांनी दाखवलेला विश्वास हा विश्वासार्हता, पारदर्शकता आणि समर्पित सेवांच्या भक्कम पायावर उभा आहे. डिजिटल युगातही ग्राहक इंडिया पोस्टच्या व्यापक नेटवर्क आणि विश्वासार्ह सेवांमुळे टपाल सेवांना पसंती देत आहेत.

या उपक्रमाचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांनी आपल्या समाधानाची भावना व्यक्त केली आणि पुणे मुख्य टपाल कार्यालय परिसरात अशा सुविधेची स्थापना झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ग्राहकांच्या बदलत्या गरजांनुसार टपाल विभाग सातत्याने प्रगत होत असून सेवांचा वारसा जपत आधुनिक सुविधा उपलब्ध करून देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

मान्यवर ग्राहक कर्नल भगतसिंग यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की, मी सैन्य अधिकारी म्हणून २० पेक्षा अधिक देशांमध्ये प्रवास केला असून जगभरातील टपाल सेवा अनुभवल्या आहेत. पुणे मुख्य टपाल कार्यालयातील समर्पित आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग केंद्र अत्यंत प्रभावी असून येथे उत्कृष्ट ग्राहकाभिमुख सुविधा व व्यावसायिक वातावरण आहे. कर्मचारी नम्र, कार्यक्षम आणि नेहमी मदतीस तत्पर आहेत. या सेवेबद्दल मी अत्यंत समाधानी असून आपल्या टपाल विभागातील हा सकारात्मक बदल पाहून अभिमान वाटतो.

ग्राहक, व्यावसायिक संस्था, निर्यातदार, विद्यार्थी आणि उद्योजक यांनी पुणे मुख्य टपाल कार्यालयातील या समर्पित आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग केंद्रास भेट देऊन देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पार्सल सेवांसाठी उपलब्ध सुधारित सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. टपाल विभाग सर्व ग्राहकांना कार्यक्षम, ग्राहकाभिमुख आणि विश्वासार्ह सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे.

या कार्यक्रमास वरिष्ठ टपाल अधिकारी, कर्मचारी तसेच विविध उत्पादक, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (चडचए), वस्त्रव्यवसाय, पुस्तक विक्रेते, इलेक्ट्रॉनिक्स विक्रेते, शेतकरी उत्पादक संस्था, स्वयं-सहाय्यता गट, ग्रामीण कारागीर, हस्तकला उत्पादक, कृषी उत्पादन विक्रेते, स्थानिक विशेष वस्तू व भेटवस्तू विक्रेते आदी मान्यवर उपस्थित होते.

कोणत्याही तक्रार निवारणासाठी ग्राहकांनी श्री. अमेय निमसुडकर, वरिष्ठ पोस्टमास्तर, पुणे मुख्य टपाल कार्यालय किंवा श्री. अनुप नहाटे, पीआरआय (पी), पुणे मुख्य टपाल कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. तसेच कोणत्याही माहितीसाठी व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२१३७२३१७ वर संपर्क साधता येईल.

# दयानंद कला महाविद्यालयात २ री, ३ री व ४ थीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमासाठी जिल्हास्तरीय शिक्षक प्रशिक्षणास प्रारंभ




**लातूर/प्रतिनिधी:** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे तथा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ऊखएढ), मुरूड, जि. लातूर यांच्या वतीने २ री, ३ री व ४ थीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमासंदर्भातील जिल्हास्तरीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे २२ जून ते २५ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

हा प्रशिक्षण कार्यक्रम डायटचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे.

उद्घाटन समारंभात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, नव्या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला (स्किल डेव्हलपमेंट) विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्यात विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

अध्यक्षीय समारोप करताना डायटचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या विचारांच्या कक्षा रुंदावणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. जोपर्यंत विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होत नाही, तोपर्यंत त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही, असे ते म्हणाले.

प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील विविध शाळांमधील मराठी १८० व उर्दू १२०शिक्षक सहभागी झाले असून नव्या अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे. या प्रशिक्षणात सुलभक म्हणून परमेश्वर शृंगारे श्रीमती वर्षाराणी मुस्कावाड,

श्री शशिकांत नाब्दे,श्री बसवेश्वर थोटे,श्री बालभीम गायकवाड ,श्री अनिल बिरादार,श्री भीमाशंकर स्वामी,श्री सुनील सातपुते, श्री सूर्यकांत बोईनवाड श्री विजय राऊत,श्री.अंजली स्वामी,अधिव्याख्याता श्रीमती सुचित्रा जाधव, मुख्य संयोजक जेष्ठ अधिव्याख्याता श्री अनिल जाधव यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर संचलन श्रीमती ज्योती वंजे यांनी केले.

# बाजार समितीतील घटक जोपासतायत सामाजिक बांधिलकीचा लातूर पॅटर्न

## सलग २६ वर्षापासून पाठवितात चाकरवाडीच्या हरीनाम सप्ताहास धान्याचा ट्रक




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर बाजार समितीला राज्यात मानाचे स्थान मिळवून देण्यात बाजार समितीतील विविध घटकांचा सिहांचा वाटा आहे. यासोबतच बाजार समितीतील या घटकांकडून सामाजिक बांधिलकीही जोपासली जात आहे. दरवर्षी विविध उपक्रम राबवून बाजार समितीतील घटक आपली सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करीत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणजे सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांचा चाकरवाडी येथे होणाजया अखंड हरिनाम सप्ताहास गेल्या २६ वर्षापासून धान्याचा ट्रक पाठविला जातो. यंदाच्या वर्षीही हा धान्याचा ट्रक माजी आमदार वैजनाथ शिंदे व सभापती जगदीश बावणे यांच्या प्रमुख उपस्थितीत चाकरवाडीकडे रवाना करण्यात आला आहे.

लातूर बाजार समितीने राज्यात मानाचे स्थान मिळविलेले आहे. हे स्थान मिळविण्यात बाजार समितीतील व्यापारी, आडते यांच्यासह विविध घटकांचा सिंहाचा वाटा आहे. बाजार समितीतील हे घटक केवळ व्यापारातच नव्हे तर सामाजिक बांधिलकी जोपासण्यातही अग्रेसर आहे. दरवर्षी बाजार समितीच्या आवारात या घटकांच्या वतीने विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासली जाते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणजे चाकरवाडी येथे पार पडत असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहास गेल्या २६ वर्षापासून मोफत धान्य रवाना करण्यात येते. बाजार समितीतील विविध घटकांच्या सहकार्यातून हा ट्रक अखंड हरीनाम सप्ताहात होणाजया अन्नसेवेसाठी महत्वाचा ठरत आहे. याही वर्षी म्हणजे २७ व्या वर्षी आज हा धान्याचा चाकरवाडीकडे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत रवाना करण्यात आला.

सदर ट्रक रवाना होण्यापूर्वी माजी आमदार वैजनाथ शिंदे व सभापती जगदीश बावणे, व्यापारी अशोक अग्रवाल, बालाप्रसाद बिदादा, संचालक अनिल पाटील, युवराज जाधव, अनंत पवार, श्रीनिवास शेळके, बालाजी वाघमारे, शिवाजी कांबळे यांच्यासह सुधीर गोजमगुंडे, अशोक लोया, अमर पवार, तुळशीदास गंभीरे, रमेश सूर्यवंशी, सुरेश मालू, निवृत्ती ढवळे, गुलाब मोहिते यांची उपस्थिती होती.

रवाना झालेल्या या धान्याच्या ट्रकमध्ये १०२ तेल डब्बे, साखरेचे २३ पोते, गव्हाचे १७६ कट्टे, हरभरा डाळीचे ६२ कट्टे, तूर डाळीचे ७ कट्टे, एक मीठाचे पोते व चिंचेचा कट्टा या जिन्नसांचा समावेश होता. चाकरवाडी येथे होत असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहास या धान्याच्या माध्यमातून अन्नसेवेत महत्वाचे योगदान प्राप्त होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानोबा साखरे, सुधीर बोरुळे, संजय माने, बालाजी जाधव, डिगंबर माळवदे, व्यंकट शिंदे, नवनाथ कवितगे, श्रीराम गायकवाड, सुरेश देशमुख, जयकुमार गोरे आदींसह बाजार समितीतील विविध घटकांनी योगदान दिले होते.

# रीचेकिंग मध्ये इयत्ता १० वी,१२ उत्तीर्ण व गुण वाढलेल्या विद्यार्थी,पालकांचे प्रत्येकी ८०० रुपये घेतलेले शुल्क परत करण्याची विद्यार्थी पालक मंचची मागणी

**लातूर/प्रतिनिधी** :दिनांक २४.०६.२०२६ रीचेकिंग मध्ये इयत्ता १० वी,१२ उत्तीर्ण व गुण वाढलेल्या विद्यार्थी,पालकांचे प्रत्येकी ८०० रुपये घेतलेले शुल्क परत करण्याची मागणी विद्यार्थी पालक मंचच्या वतीने निवेदनाद्वारे श्रीमती अनुपमा जी भंडारी , सचिव, विभागीय शिक्षण मंडळ, लातूर यांना करण्यात आली आहे तर निवेदनाची एक प्रत श्री.सुधाकर जी तेलंग अध्यक्ष, विभागीय शिक्षण मंडळ, लातूर यांना ही देण्यात आली आहे.

लातूर विभागीय शिक्षण मंडळा अंतर्गत इयत्ता दहावी, बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल लागल्या नंतर विद्यार्थ्यांना कमी गुण मिळाल्याचे वाटल्यास त्यांना पेपर रिचेकिंग करून घेण्याची संधी असते. या संधीचा दहावीच्या ६०० तर बारावीच्या ५५० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे.रिचेकिंग मध्ये दहावीचे नापास झालेले १० विद्यार्थी पास झाले आहेत तर बारावीचे २१ विद्यार्थी पास झाले आहेत.

दहावीच्या ६०० विद्यार्थ्यांनी तर बारावीच्या ५५० विद्यार्थ्यांनी रिचेकिंगसाठी अर्ज केले होते. त्यातील दहावीचे ८०% तर बारावीच्या ८५ % विद्यार्थ्यांचे रिचेकिंग मध्ये गुण वाढले आहेत. रिचेकिंग मध्ये पास झालेल्या विद्यार्थ्यांना आता अकरावी व पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेता येणार आहे.रिचेकिंग मध्ये विद्यार्थ्यांचे गुणदान वाढले आहे तर अनुउत्तीर्ण झालेले विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत ही विद्यार्थ्याच्या शैक्षणिक भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत चांगली व महत्त्वाची बाब आहे. पण तितकीच लातूर विभागीय शिक्षण मंडळाच्या तपासणी कारभारावर प्रश्न चिन्ह निर्माण करणारी आहे. रिचेकिंग अर्ज करण्यापूर्वी अनुउतीर्ण झालेल्या, गुण कमी पडलेल्या विद्यार्थ्यांना व पालकांना कोणत्या मानसिक स्थितीतून जावे लागले असेल, अनेकदा विद्यार्थ्यांस अपेक्षे पेक्षा गुण कमी पडले, अनुउतीर्ण झाले म्हणून अनेक विद्यार्थी चुकीचे मार्ग निवडतात, त्यामुळे अनेक पालकांना अकाली दुःख वाट्याला आल्याचे अनेक उदाहरणे घडलेले आहेत,याला जबाबदार कोण? त्यात विद्यार्थी, पालकांना रिचेकिंग करण्यासाठी जवळपास ३०० रुपये शुल्क, रिकाउंटिंग साठी ३०० रुपये शुल्क, रिव्हॅल्यूशन साठी ४०० रुपये तर नोंदणीसाठी १०० रुपये अशा पद्धतीने किमान प्रती विद्यार्थ्यांस किमान ८०० रुपये शुल्क मोजावे लागले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी, पालकांनी आर्थिक विवचनेतून किंवा आत्मविश्वास अभावी वरील प्रमाणे अर्ज केले नसतील तर त्याचा दोष काय? कदाचित त्याचे ही गुण वाढले असते किंवा उत्तीर्ण झाले असते.

लातूर विभागीय शिक्षण मंडळाच्या वतीने सदोषपणे कर्तव्य पार पाडले गेले असते तर विद्यार्थी, पालकांना मानसिक त्रास व आर्थिक त्रास सहन करावा लागणार नाही. त्यामुळे उत्तीर्ण झालेल्या व गुण वाढलेल्या विद्यार्थी, पालकांचे शुल्क परत करण्याबाबत संबधिताना सूचित करण्याची मागणी विद्यार्थी पालक मंचच्या वतीने अँड प्रदीपसिंह गंगणे, ताहेरभाई सौदागर , रौफ बागवान , मुस्दीक करपुडे , अँड बालाजी राजमल्ले आदींनी केली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# दिवंगत पोलीस पाटीलाच्या पत्नीस ५० लाख धनादेश पोलीस अधीक्षकांचे हस्ते सुपूर्त

**धाराशिव/ प्रतिनिधी:** दवंगत पोलीस पाटील जयसिंग सरवदे रा. जि. धाराशिव हे कोरोना महामारीच्या काळामध्ये त्यांच्या गावातील कोरोना निर्मूलन दक्षता समितीमध्ये कार्य पार पाडत असताना. त्यांचा दिनांक.१०/०४/२०२१ रोजी कोरोना रोगाच्या साथीने मृत्यू झाला. कोविड १९ संबंधित कर्तव्य बजावत असताना कोविडमुळे मृत्यू होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना विमा कमवच म्हणून शासनाने सहानुग्रह अनुदान रुपये ५० लक्ष इतके देण्याचे शासन निर्णय जारी केले होते त्या अनुषंगाने रक्कम रुपये ५० लक्ष रुपयाचा धनादेश त्यांची वारसदार पत्नी सौ सरवदे यांना दि.२३.०६.२०२६ रोजी पोलीस अधीक्षक. धाराशिव श्रीमती रितु खोखर मॅडम यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आला. यावेळी त्यांच्या समवेत धाराशिव जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष. व पोलीस अधीक्षक कार्यालयाचे कार्यालय अधीक्षक. सुनील बाबर हे उपस्थित होते.

# विमुक्त,भटक्या व विशेष मागास प्रवर्गासाठी विविध कर्ज योजनांना चालना ; लाभार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

**धाराशिव/ प्रतिनिधी:** वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या) तसेच त्याअंतर्गत कार्यरत सहा उपकंपन्यांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी उद्दिष्टे प्राप्त झाली असून विमुक्त जाती,भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध कर्ज व व्याज परतावा योजना राबविण्यात येत आहेत.पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करावेत,असे आवाहन अतिरिक्त जिल्हा व्यवस्थापक पी.एम.झोंबाडे यांनी केले आहे.

***वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना***

(IR-1) या योजनेअंतर्गत १५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना १२ टक्क्यांपर्यंत व्याजाची रक्कम आधार लिंक असलेल्या बँक खात्यात जमा केली जाते.अर्जदार हा विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील असावा व त्याचे वय १८ ते ५० वर्षे दरम्यान असणे आवश्यक आहे. यासाठी आधारकार्ड,पॅनकार्ड, रहिवासी दाखला,उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला,शाळा सोडल्याचा दाखला तसेच वाहन व्यवसायासाठी आवश्यक परवाना आदी कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावी लागतात.

***गट कर्ज व्याज परतावा योजना***

या (IR-2) अंतर्गत १० लाख ते ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी गट नोंदणीकृत असणे आवश्यक असून गटातील सर्व सदस्य विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील असावेत.सदस्यांचे वय १८ ते ४५ वर्षांदरम्यान असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० असणे आवश्यक असून उत्पन्नाची मर्यादा नॉन-क्रीमीलेअर प्रवर्गासाठी आठ लाख रुपयांपर्यंत आहे.अर्जासाठी जातीचा दाखला,उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला,आधारकार्ड,शाळा सोडल्याचा दाखला तसेच व्यवसायासंबंधीचे कोटेशन आदी कागदपत्रे ऑनलाईन सादर करावी लागतील.

***एक लाख रुपये थेट कर्ज योजना***

ही योजना देखील लाभार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.या योजनेत संपूर्ण कर्जरक्कम महामंडळाकडून दिली जाते.लाभार्थ्याने दरमहा २ हजार ८५ रुपये असे ४८ समान हप्ते नियमित भरल्यास कोणतेही व्याज आकारले जात नाही.मात्र थकीत हप्त्यांवर वार्षिक चार टक्के व्याजदर लागू राहणार आहे.यासाठी दोन जामीनदार व बोजा नोंदणी आवश्यक असून जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला (एक लाख रुपयांपर्यंत), रेशनकार्ड,आधारकार्ड, रहिवासी दाखला व व्यवसायानुसार आवश्यक कागदपत्रे जोडावी लागतील.

***२५ टक्के बीज भांडवल कर्ज योजना***

या योजनेची मर्यादा पाच लाख रुपये असून ती बँकेमार्फत कार्यान्वित केली जाते.कर्जामध्ये बँकेचा सहभाग ७५ टक्के तर महामंडळाचा सहभाग २५ टक्के आहे.बँकेचे व्याजदर संबंधित बँकेच्या नियमांनुसार लागू राहतील,तर महामंडळाच्या वाट्याच्या रकमेवर चार टक्के व्याजदर आकारला जातो.यासाठी जातीचा दाखला,उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड,रहिवासी दाखला,पॅनकार्ड तसेच व्यवसायानुसार आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतील.यापूर्वी महामंडळाच्या कर्ज योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना पुन्हा कर्ज प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

सर्व योजना ऑनलाईन स्वरूपात असून अर्जदारांनी www.vjnt.org या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत.अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या), डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,जिल्हा कार्यालय,धाराशिव येथे अथवा दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२९९१५६ वर संपर्क साधावा, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा व्यवस्थापक पी.एम.झोंबाडे यांनी केले आहे.

# खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या पाठपुराव्याला यश: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडून धाराशिव शहरातील विकासकामांसाठी १८ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी

**धाराशिव/(प्रतिनिधी शेख अंजुम):** खासदार ओमराजे निंबाळकर यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करताच दुसऱ्याच दिवशी धाराशिव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या प्रयत्नाने यश मिळाले असून राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी धाराशिव नगरपरिषद क्षेत्रातील विविध विकासकामांसाठी तब्बल १८ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे. या निधीमुळे शहराच्या विकासाला नवी गती मिळणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अनेक सुविधा अधिक सक्षम व आधुनिक होणार आहेत.

धाराशिव शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर आधुनिक नागरी सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन खासदार ओमराजे निंबाळकर यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या महत्त्वपूर्ण विकासकामांसाठी निधी मंजूर केला आहे.

मंजूर निधीतून खालील विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत –

धाराशिव नगरपरिषद क्षेत्रातील आठवडे बाजार विकसित करण्यासाठी रक्कम ८ कोटी मंजुर करण्यात आली. शहरातील व्यापारी, शेतकरी आणि ग्राहकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहे.

राजमाता जिजाऊ उद्यान विकसित करण्यासाठी रक्कम ५ कोटी मंजुर करण्यात आली. नागरिकांसाठी दर्जेदार विरंगुळा केंद्र निर्माण करण्याच्या उद्देशाने उद्यानात आकर्षक सुशोभीकरण, पादचारी मार्ग, प्रकाश व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी तसेच पर्यावरणपूरक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



छत्रपती संभाजी महाराज उद्यान विकसित करण्यासाठी रक्कम रु. ३ कोटी मंजुर करण्यात आली. शहरातील युवक, ज्येष्ठ नागरिक व कुटुंबांसाठी आधुनिक स्वरूपाचे उद्यान विकसित करण्यात येणार असून हरित क्षेत्र वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान विकसित करण्यासाठी रक्कम रु. २ कोटी मंजुर करण्यात आली. उद्यानाचे सुशोभीकरण, आकर्षक प्रकाश व्यवस्था, बैठकीची व्यवस्था, व्यायाम साधने व इतर नागरी सुविधा निर्माण करून हे उद्यान नागरिकांसाठी अधिक उपयुक्त होणारआहे. कामांमुळे धाराशिव शहराच्या सौंदर्यात भर पडण्याबरोबरच नागरिकांना दर्जे दार नागरी सुविधा उपलब्ध होणार आहेत. शहरातील सौंदर्य वाढणार आहे.

याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सांगितले की, धाराशिव शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध कामांसाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक भूमिका घेत १८ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे शहराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. भविष्यातही धाराशिव जिल्ह्यासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी या निधीस मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस , उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री मा.सुनेत्रा पवार यांचे आभार मांडले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष आभार मानले आहेत. या निर्णयामुळे धाराशिव शहराच्या विकासाचा नवा अध्याय सुरू होणार असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत असून, शहरातील विविध स्तरांतून या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

सदरील विकास कामे ही नगर परीषद यांच्याऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग धाराशिव यांच्यामार्फत होणार असून सदरील निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला वर्ग होणार आहे.

# ध्येय, परिश्रम, सातत्याच्या बळावर मिळते यश: जिल्हा परिषद सदस्य मोरे

**उमरगा/प्रतिनिधी:** जीवनात यशस्वी व्हायचे तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. मराठी माध्यमातील शाळेतून अनेक गुणवंत निर्माण होत आहेत. हेच यशाचे खरे साधन असल्याने विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्याच्या बळावर उच्च ध्येय गाठावे. समाज व देशाच्या प्रगतीत आपले योगदान द्यावे, असे जिल्हा परिषद सदस्य लताताई मोरे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील बेडगा येथील भारत विद्यालयात यशस्वी आणि गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा मंगळवारी (दि. २३) आयोजित करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी भारत शिक्षण संस्थेचे संचालक भानुदास माने, हरिभाऊ माने, गणपती माने, इस्माईल मुजावर, किशोर माने, नेताजी गायकवाड, धोंडोपंत माने, मुख्याध्यापक आर. एल. चौहान उपस्थित होते.

या वेळी विविध परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये कौतुक आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी शिक्षक डॉ. ज्ञानेश्वर माशाळकर, योगेश माने, अनिल मदनसुरे, अनिता पवार, कल्पना कांबळे, कल्पना सुरवसे, रवी माने, विजय माने यासह पालक, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी समाजाच्या प्रबोधनासाठी सक्रिय राहावे या वेळी लताताई मोरे म्हणाल्या, शिक्षणामध्ये येणाऱ्या अपयशाने खचून न जाता धैर्याने पुढची पायरी गाठण्याची इर्षा ठेवणे गरजेचे आहे. शिक्षणाने उच्च पदावर गेल्यानंतर सामाजिक बांधिलकी जपून समाजाच्या प्रबोधनासाठी सक्रिय राहावे. शिक्षण प्रक्रियेत मोठी स्पर्धा असून, या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे. प्रतिकूल परिस्थितीतूनही मार्ग काढण्याची क्षमता असल्यास नक्कीच यश मिळते. आई, वडिलांच्या संस्काराची शिदोरी व गुरुजनांच्या ज्ञानाची शिदोरीसोबत घेऊन युवा पिढीने त्यांचे मार्गदर्शनाने वाटचाल करावे.

# हॉटेलमध्ये तरुणीवर केला लैंगिक अत्याचार,पतीस मारहाण:गुन्हा दाखल

**धाराशिव/प्रतिनिधी:** धाराशिव शहर पोलीस ठाणे अंर्तगत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, एका गावातील १९ वर्षीय महिला दि.२२.०६.२०२५ रोजी ही व तिचे पती असे हॉटेल मधील रुम मध्ये आराम करण्यासाठी जात असताना हॉटेल मधील तीन तरुणांनी पिडीतेचे पतीस चाकुचा धाक दाखवून जिवे ठार मारण्याची धमकी देवून त्यातील एकाने तरुणानी तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. व दुसरे दोन तरुणानी पिडीतेच्या पतीस मारहाण करुन झालेला प्रकार कोणास सांगितल्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२३.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(१),१२६( ७८, ३५१(३) सह कलम ४, ८, १२ लैंगिक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गु), १२७ (२), ११८(१), ३२४(४), ३५१(२), ३५२, ३(५) सह अ.जा.ज.अ. प्र. अधिनियम कलम ३(१)(आर)(एस), ३(१)(डब्ल्यु)(ळ)(ळळ) ३(२)(व्हिए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# जिल्ह्यातील ३५० गावांमध्ये एकल महिलांचा गौरव: आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त महिला व बालविकास विभागाचा उपक्रम

**धाराशिव/ प्रतिनिधी: (शीला उंबरे-पेंढरकर)**-जिल्ह्यातील ३५० गावांमध्ये एकल महिला दिनानिमित्त विधवा महिलांचा विशेष सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त महिला व बालविकास विभागाच्या वतीने अंगणवाड्यांच्या माध्यमातून उपक्रम राबवण्यात आला. यावेळी महिलांना विविध प्रकारच्या शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. तसेच योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शनही करण्यात आले.

महिला व बाल विकास आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मसुदा समिती गठित करण्यात आली आहे. समितीच्या बैठकीत एकल महिला धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि वास्तवाधिष्ठित करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद, नगरपंचायत आणि ग्रामपंचायत स्तरावर तसेच प्रत्येक गाव, तालुका व प्रभागामध्ये मंगळवारी 'आंतरराष्ट्रीय विधवा दिन' निमित्त 'एकल महिला दिवस' साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अंगणवाड्यांच्या माध्यमातून ३५० गावांमध्ये घेण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत 'विधवा' या शब्दाऐवजी 'एकल महिला' ही संज्ञा वापरून गाव व शहरातील सर्व एकल महिलांना निमंत्रित करण्यात आले. त्यांच्या समस्या, अडचणी आणि शासनाकडून अपेक्षित उपाययोजनांबाबत चर्चा आयोजित करण्यात आली. तसेच महिलांनी उभारलेल्या यशस्वी उपक्रमांची माहिती देऊन त्यांचा सत्कार आणि प्रेरणादायी संवाद साधण्यात आला. यासाठी धाराशिवच्या महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे यांच्यासह एकल महिला विभागातील अधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. महिलांना विविध शासनाचे शासन निर्णय या वेळी वाचून दाखवण्यात आले. तसेच एकल महिलांना येणाऱ्या अडचणींचा निपटारा करण्यासाठी अंगणवाडीच्या माध्यमातून नियोजन करण्यात आले. या उपक्रमात अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, महिला बचत गट आणि स्थानिक यंत्रणांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

महिलांना जोडले बचत गटांना अनेक एकल महिला पतीच्या निधनानंतर हतबल होतात. त्यांना आर्थिक आधार मिळत नाही. यामुळे बचत गटांमध्ये नसलेल्या महिलांना बचत गटांशी जोडण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात आली. यावेळी बचत गटाच्या माध्यमातून कशापद्धतीने खेळते भांडवल उपलब्ध करून व्यवसायाची उभारणी करण्यात येते. याचीही माहिती यावेळी देण्यात आली. तसेच अनेक महिलांना कर्ज उपलब्ध करून देण्यात आले.

# रुढी-परंपरा मोडीत काढून एकल महिलांना सन्मान द्या: विजय जाधव यांचे मार्गदर्शन

**लोहारा/ प्रतिनिधी:** रूढी-परंपरा मोडीत काढून एकल महिलांना सन्मानाने वागणूक दिली जावी. पण समाजामध्ये असं न घडता महिलेचा पती वारल्यानंतर लगेच त्या महिलेचे कुंकू पुसले जाते व बांगड्या फोडल्या जातात. याची कुठेतरी समाजात जनजागृती करून ज्या एकल महिला आहेत. त्यांनाही सर्वसामान्य महिलांसारखे सन्मानाने जगता आले पाहिजे. त्यासाठी महिलेचे अलंकार, कुंकू लावून एकल महिलांना सर्वच कार्यक्रमात सन्मान दिला जावा. त्याचबरोबर कौटुंबिक वाद व पती-पत्नी वाद-विवाद होत असतात, अशातूनच कोर्ट-कचऱ्या होतात. त्यामुळे असे वादविवाद न करता सामंजस्याने सोडवले पाहिजे, असे वाद समिती सामंज्यसाने सोडवत आहे, असे प्रतिपादन साऊ समितीचे जिल्हाध्यक्ष विजय जाधव म्हणाले.

लोहारा तालुक्यातील माकणी येथे शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाची सुरुवात एकल महिलांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

या मेळाव्यात समितीचे जिल्हाध्यक्ष विजय जाधव यांनी बाल संगोपन, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, श्रावणबाळ योजना तसेच दिव्यांग योजना याबाबत सविस्तर माहिती दिली. या वेळी अनेक लाभार्थींनी पेन्शन काही महिन्यांपासून बंद असल्याची अडचण मांडली. समितीमार्फत मिशन वात्सल्य समितीच्या बैठकीत या विषयावर चर्चा करण्यात येईल असे सांगितले.

लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा केला जाईल जे गरजू लाभार्थी शासकीय योजनेपासून वंचित राहिले आहेत, अशा लाभार्थींचे फॉर्म भरून समितीमार्फत शासकीय नियमानुसार लाभार्थींना लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा करण्यात येईल, असेही विजय जाधव यांनी सांगितले.

# धाराशिव जिल्हा पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

**धाराशिव/ प्रतिनिधी:** तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान तुळजापूर पोलीसांनी दि.२३.०६.२०२६ रोजी तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत जुने बसस्थानक पाठीमागे छापा टाकला. यावेळी भारत तुकाराम रा. पुजारी नगर तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव हे जुने बसस्थानकचे पाठीमागे कल्याण मटका जुगाराचे साहित्य असा एकुण १,३३० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले तुळजापूर पो. ठाणेच्या पथकास आढळले. तसेच मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान मुरुम पोलीसांनी दि.२३.०६.२०२६ रोजी मुरुम पोलीस ठाणे हद्दीत दाळींब येथे छापा टाकला. यावेळी विठ्ठल रा. दाळींब ता. उमरगा हे दाळींब येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्य असा एकुण ६५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले मुरुम पो. ठाणेच्या पथकास आढळले.यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर धाराशिव (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,DHARASHIV(Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649